SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीग्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १८.०५.२०२६ | अंक नं. ०४० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

श्रद्धास्थान





## होत राहो बुलंद कामगिरी.
## आई भवानीची कृपा आपल्यावरी !





### मा. श्री. विकीशेठ जगताप

(नगरसेवक, अहिल्यानगर महानगरपालिका)

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छूक -

**श्री. शिवाजी खेंडके**

व कामठी ग्रामस्थ, ता. श्रीगोंदा

Design Addict

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने चोरट्यांनी पळविले; गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील खंडाळा शिवारात एका घराचे पाठीमागचे पत्रे उचकटून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने व रोकड असा ५२ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात अतिष भिमराव नवले (वय २५, रा. खंडाळा, ता.नगर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, १५ मे रोजी रात्री ११ ते १६ मे रोजी पहाटे ५ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या पाठीमागील बाजूचा पत्रा उचकटून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातून २० हजार रूपये रोख, १५ हजार रूपयांचा एक मोबाईल, सात हजार रूपये किमतीचे सोन्याचे दीड ग्रॅमचे मणीमंगळसूत्र, पाच हजार रूपयांचे चांदीचे १२ भार वजनाचे कडे आणि चार हजार रूपयांची सोन्याची अर्धा ग्रॅमची नथ व चांदीची साखळी असा एकूण ५२ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला.

या चोरीच्या घटनेसोबतच परिसरात एक अजब प्रकारही समोर आला आहे. अज्ञाताने फिर्यादीच्या शेजारी राहणारे रवी म्हस्के यांच्या पॅन्टीचा भाग कात्रीने कापून नुकसान केले. तसेच गावातील एका लहान मुलीच्या अंगावरील कपडे आणि पांघरलेले घोंगडे देखील कात्रीने कापून नुकसान केले आहे. या विचित्र प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार खरात हे पुढील तपास करत आहेत.

# निवडणूक कामात हलगर्जीपणा केल्याने मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

नगर -भारत निवडणूक आयोगाच्या अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय कर्तव्यात कसूर आणि टाळाटाळ केल्याप्रकरणी सावेडी येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) राजेंद्र बबन फुलारी यांच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुनील बाजीराव नेटके यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी सुनील नेटके हे पेमराज सारडा कॉलेजमध्ये ग्रंथालय लिपीक असून, मे २०२५ पासून निवडणूक शाखेत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या अंतर्गत एकूण १० बीएलओ काम पाहतात, ज्यामध्ये आरोपी राजेंद्र फुलारी यांचा समावेश आहे.

अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघांतर्गत मतदार यादी अद्ययावत करणे आणि मतदार मॅपिंगचे अत्यंत महत्त्वाचे काम चालू आहे. महानगरपालिका कर्मचारी असलेल्या राजेंद्र फुलारी यांची सन २०२३ पासून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. मात्र, त्यांनी १६ एप्रिल २०२६ ते ११ मे २०२६ या काळात निवडणूक कामात मोठ्या प्रमाणावर विलंब, टाळाटाळ आणि हलगर्जीपणा केल्याचा आरोप आहे. हे काम राष्ट्रीय स्वरूपाचे आणि गंभीर असल्याने वरिष्ठांनी त्यांना दैनंदिन बैठकांद्वारे तसेच लेखी आणि तोंडी स्वरूपात अनेकदा समज दिली होती. कामात सुधारणा करून हजर होण्याबाबत ११ मे रोजी लेखी आदेश देऊनही फुलारी यांनी मॅपिंगचे कोणतेही काम केले नाही. निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणल्याने सहायक मतदार नोंदणी अधिकारी स्वप्निल ढवळे यांच्या लेखी आदेशानुसार ही तक्रार करण्यात आली.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी आरोपी राजेंद्र बबन फुलारी यांच्याविरुद्ध लोकप्रतिनिधीत्व कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे.

## मिराबाई रायसिंघानी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - सथ्था कॉलनी येथील मिराबाई मूलचंद रायसिंघानी (वय ९५) यांचे १७ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. कापड बाजार येथील बॉम्बे पेन सेंटरचे मोहन, भगवान रायसिंघानी यांच्या त्या मातोश्री होत.

## सौ. प्रिती बोगावत यांचे दु:खद निधन



नगर - लक्ष्मीकारंजा येथील रहिवासी सौ. प्रितीताई प्रतीक बोगावत (वय ४०) यांचे १७ मे रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. प्रतीक बोगावत यांच्या पत्नी, धनराज बोगावत यांच्या सून, विलास मुनोत यांची मुलगी तर प्रणिल, राकेश, प्रणव यांच्या त्या वहिनी तर सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या त्या संचालिका होत्या.

## शिवतेज बिबे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - कौडगाव (ता. जि.नगर) येथील रहिवासी पै. शिवतेज बाळासाहेब बिबे (वय २५) यांचे १७ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कौडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, आई, वडील, १ बहीण, मेहूणे असा परिवार आहे.

## प्रभाकर हजारे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी पांडुरंग वस्त्र भांडारचे संचालक, ग्रामपंचायतचे माजी सदस्य प्रभाकर पंढरीनाथ हजारे (वय ७५) यांचे १८ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मेहेकरी नदीतीरी येथील स्मशानभूमीममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, १ भाऊ, भावजय, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. माजी सरपंच राजेंद्र हजारे यांचे ते बंधू होत.

## वैष्णवीताई सोमाणी यांचे अपघाती निधन



नगर - भीलवाडा येथील रहिवासी वैष्णवीताई मुस्कान सोमाणी (रा.भीलवाडा, वय २८) यांचे १६ मे रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १७ मे रोजी सोनेवाडी रोड केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अशोक लाहोटी यांची मुलगी तर अतुल लाहोटी यांच्या त्या पुतणी होत.

## सौ.नीता सातदिवे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील सौ.नीता भास्कर सातदिवे (वय ६६) यांचे अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ग्रामीण रुग्णालयातील सेवानिवृत्त डॉ.भास्कर सोनाजी सातदिवे यांच्या पत्नी, हरिकमल प्लाझा येथील सातदिवे डेंटल क्लिनिकचे डॉ.सुशांत सातदिवे, प्रशांत सातदिवे व सौ.सविता आदेश गायकवाड यांच्या मातोश्री होत.

## गोविंदराव शेटे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - नगर तालुक्यातील जेऊर येथील ज्येष्ठ नागरिक गोविंदराव शेटे (वय ९२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे.

गोविंदराव शेटे यांनी ब्रिटिश कालीन परिस्थिती जवळून अनुभवली होती. त्या काळातील सामाजिक जीवन, शेतीची पद्धत, जुन्या परंपरा, गावातील घटना तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक रंजक किस्से तरुणांना सांगत असत. सभोवताली आढळणाऱ्या अनेक आयुर्वेदिक वनस्पतींचे फायदे त्यांना माहीत होते. विविध रुग्णांवर त्यांच्याकडून झाडपाल्याचे औषध देऊन रुग्ण ठणठणीत झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. खंडू (बाळू) शेटे तसेच रावसाहेब शेटे यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



मनपाचे कर्ज प्रकरण आणि भूसंपादनाच्या मुद्यावर चर्चा करताना शिवसेनेचे शिष्टमंडळ.

# मनपाचे कर्ज प्रकरण आणि भूसंपादनावरुन न्यायालयात याचिका दाखल करणार : आयुक्तांना शिवसेनेचा इशारा

नगर - महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात येणारे नवीन कर्ज आणि बोल्हेगाव ते सावेडी ते कल्याण रोडच्या सीना नदीलगतच्या भूसंपादनाच्या विषयावरून शिवसेनेने मनपा प्रशासनाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. महापालिकेला पूर्वीचेच सुमारे ८०० कोटी रुपयांचे देणे असताना आणखी कर्जाचा बोजा जनतेवर टाकू नका, अन्यथा न्यायालयात याचिका दाखल करु, असा इशारा शिवसेनेच्यावतीने करण्यात आला आहे.

शिवसेनेच्याच्या शिष्टमंडळाने १८ मे रोजी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेवून निवेदन दिले. तसेच आयुक्तांशी चर्चा करीत १५ मे रोजी तहकूब झालेल्या सर्वसाधारण सभेचा निषेध करण्यात आला. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे आणि शहरप्रमुख संभाजी कदम यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मनपा आयुक्तांशी या विषयावर सविस्तर चर्चा केली. यावेळी गटनेते दत्तात्रय कावरे, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, विक्रम राठोड, अॅड. स्वाती जाधव, नवनाथ कातोरे, काका शेळके, परेश लोखंडे, प्रशांत गडाख, सलोनी शिंदे, तृप्ती साळवे, संग्राम कोतकर, प्रशांत गायकवाड, चेतन शिरसुल, विशाल शितोळे उपस्थित होते.

शिवसेनेने निवेदनात म्हटले आहे, नेहरू मार्केट, गंजबाजार, भाजीबाजार विकसित करणे, सावेडी येथे व्यापारी संकुल उभारणे आणि सर्जेपुरा येथील रंगभवन विकसित करणे ही सर्व कामे बीओटी तत्त्वावर करावीत. सावेडी भुयार गटार योजनेसाठी केंद्र व राज्य सरकारकडून १०० टक्के अनुदान मिळवणे सहज शक्य आहे. मनपावर आधीच वेगवेगळ्या माध्यमातून अंदाजे ७५० ते ८०० कोटी रुपयांचे देणे असताना, नवीन कर्ज काढून दिवाळी साजरी करू नका, असा टोला शिवसेनेने लगावला आहे.

सीना नदीलगतच्या ३० मीटर रुंदीच्या रस्त्याच्या भुसंपादनाला शिवसेनेने स्पष्ट विरोध केला आहे. सध्या शहराचा नवीन विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. हा रस्ता डीपी प्लॅनमध्ये दर्शवल्यास जमीन मालकांना रोख रकमेऐवजी टीडीआर स्वरूपात भरपाई देता येऊ शकते. हा रस्ता पूरनियंत्रण रेषेत येत असल्याने भविष्यात तेथे कोणत्याही बांधकामाला परवानगी मिळणार नाही. दैनंदिन खर्च आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी मनपाकडे रक्कम उपलब्ध नसते, मग अशा कामांसाठी पैसे कुठून येतात, असा प्रश्न गटनेते दत्तात्रय कावरे व नगरसेवकांनी केला.

# आठ दिवसात वीजपुरवठा सुरळीत न केल्यास 'महावितरण'च्या अधिकाऱ्यांना काळे फासणार

## अधिकारी एसीत बसतात, तर नागरिकांना उकाड्याचा त्रास का?



शहरातील वीज समस्येबाबत महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार यांच्याशी चर्चा करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर. समवेत कुमारसिंह वाकळे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, माणिक विधाते आदी. (छाया - लहू दळवी)

नगर - अधिकाऱ्यांना बसायला थंडगार एसी, प्यायला थंडगार सब्जा घातलेले पाणी लागते तर मग जनतेला उष्माघाताने हैरानी का?, एकीकडे वीज बिल थकले तर लगेच वीज पुरवठा तोडला जातो आणि दुसरीकडे नियमित बील भरले तरीही कधीही सुचना न देताच वीज बंद केली जाते. यातून लोकांना त्रास होतो, नुकसान होते, याची भरपाई महावितरण देणार का, असा सवाल करीत ८ दिवसात वीज पुरवठ्यात सुधारणा न झाल्यास महावितरणच्या अधिकाऱ्यांना कोणतीही पूर्वसुचना न देता थेट काळे फासण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिला आहे.

या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी नगरसेवक कुमारसिंह वाकळे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, प्राध्यापक माणिक विधाते, संभाजी पवार, साधना बोरुडे, रोहिणी अंकुश, सागर गुंजाळ, सुरज कोतकर, सुरत शिंदे, दीपक खेडकर, नितीन घोडके, रणजीत सत्रे, मनोज नन्नवरे, दीपक गांगर्डे, मारुती पवार, ऋषिकेश ताठे, शैलेश मते, जॉय लोखंडे आदी उपस्थित होते.

बारस्कर म्हणाले, शहरात दिवसा आणि रात्री कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय वीज खंडित होत असल्याने नागरिक उष्माघाताने त्रस्त झाले आहेत. याचा सर्वाधिक फटका लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना बसत आहे. सतत वीज खंडीत होण्यामुळे शहराचा पाणीपुरवठाही विस्कळीत झाला असून, व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. या नुकसानीला महावितरण जबाबदार आहे. ही जबाबदारी स्वीकारुन महावितरण भरपाई देणार का? नागरिकांनी वीजबिल भरण्यास एक दिवस जरी उशीर केला, तर महावितरण विभाग तत्काळ कनेक्शन कट करतो. मग वारंवार ट्रिप होणारी लाईट सुरळीत करण्यासाठी वेळ का नसतो? हा सर्व प्रकार जाणीवपूर्वक सुरू आहे, असा आरोप संपत बारस्कर यांनी केला.

पावसाळ्यापूर्वी महावितरण विभागाने वीज वाहिन्यांची व इतर आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करावीत, नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक जाहीर करावा, विनाकारण वीज पुरवठा खंडीत करु नये, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. महावितरणचे अधीक्षक अभियंता पवार यांना निवेदन दिल्यानंतर राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी महावितरणच्या कार्यालयासमोर घोषणाबाजी केली.

# अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात जिहादी भोंदू डॉक्टरांचा सुळसुळाट

## प्रशासनाने तत्काळ भोंदू डॉक्टरांचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करावी : आ.संग्राम जगताप यांची मागणी



नगर - नगर जिल्ह्यात विविध गावांमध्ये जिहादी वृत्तीचे अनेक भोंदू डॉक्टर बऱ्याच वर्षांपासून कार्यरत आहेत. या भोंदू डॉक्टरांकडे कोणत्याही प्रकारची वैद्यकीय पदवी किंवा ज्ञान नसते. तरीही ते सर्वसामान्य रुग्णांवर बोगस औषधोपचार करत आहेत. नुकतीच राहुरी मधील अशाच भोंदू डॉक्टर तन्वीर देशमुख व श्रीरामपूर येथीलही भोंदू डॉक्टर राज शेख यांच्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे. पण असे वैद्यकीय पदवी नसलेले बरेच भोंदू अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात व संपूर्ण राज्यात सर्रासपणे बोगस औषधोपचार करून रुग्णांच्या जीवाशी खेळत आहेत. नगर, राहुरी, राहता, श्रीरामपूर येथील या भोंदू डॉक्टरांचे बंटी जहागीरदारशी काही संबंध आहेत का ? त्यांचे फंडिंग कोठून होते? याचीही चौकशी झाली पाहिजे. जिल्हा प्रशासन व जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या निष्काळजीपणामुळेच या भोंदू डॉक्टरांचे फावते आहे. त्यामुळे त्यांचीही चौकशी शासनाने करावी. जिल्हा, तालुका व शहरातील संबधित आरोग्य खात्यातील व पोलीस अधिकाऱ्यांनी अशा जिहादी भोंदू डॉक्टरांचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर तातडीने जामीन न होणारे कडक कलमे लाऊन कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आ.संग्राम जगताप यांनी केली.

आ.जगताप यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले, जिहादी भोंदू डॉक्टर सोशल मिडीयाच्या माध्यमातून बोगस औषधोपचाराचे रील बनवून सर्वसामान्य नागरिकांना आपल्या जाळ्यात ओढत आहेत. कोणतीही वैद्यकीय पदवी नसतानाही बोगस औषधांचा साठा करून ते सर्वसामान्य रुग्णांवर उपचार करून हे जिहादी त्यांची फसवणूक करत आहेत. नागरिकांनी सोशल मिडीयावरील खोट्या रीलला बळी पडू नये व अशा बोगस डॉक्टरांकडे जाऊ नये. असे शेकडो भोंदू डॉक्टर नगर जिल्ह्यात सर्रासपणे कार्यरत आहेत. जिल्हा प्रशासन, सिव्हील सर्जन यांनी आजपर्यंत केवळ बघ्याची भूमिका घेतल्याने त्या बोगस डॉक्टरांचे फावले आहे. त्यामुळे शासनाकडून सिव्हील सर्जन यांचीही चौकशी झाली पाहिजे. अधिकारी व बोगस डॉक्टर यांची काही संबंध आहेत का; यांचीही चौकशीची मागणी मी शासनाकडे करत आहे, असेही आ.जगताप यांनी सांगितले. आ.जगताप पुढे म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या ज्या विविध अधिकृत संघटना आहेत त्यांनीही अशा अधिकृत नोंद नसलेल्या भोंदू डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यवर कडक कारवाई होण्यासाठी पुढाकार घेऊन वैद्यकीय क्षेत्र बदनाम केल्याचा वेगळा गुन्हा दाखल करावा. मानवी जीवाचा खेळ करणारे हे भोंदू डॉक्टर हे ह्यूमन ट्रायल घेत होते का? हा सुद्धा फार मोठा संशय असून याची सुद्धा तपासणी झाली पाहिजे.

# आ.संग्राम जगताप आणि हिंदू धर्माबाबत सोशल मीडियावर वादग्रस्त व्हिडिओ

## दोन समाजात जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न, महिलेवर गुन्हा दाखल

नगर - सोशल मीडियाचा गैरवापर करून दोन समाजांत जातीय तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंस्टाग्राम या सोशल मीडियावर आमदार संग्राम जगताप आणि हिंदू धर्माबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधाने केल्याचा प्रकार समोर आला आहे.

कोतवाली पोलीस ठाण्याचे गोपनीय शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल अनुप शेखर झाडबुके यांनी याप्रकरणी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. फिर्यादी झाडबुके हे १७ मे रोजी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असताना, त्यांना इंस्टाग्रामवर एका आयडीवरून प्रसारित झालेला व्हिडिओ आढळला. या व्हिडिओमध्ये अफरोज हमीद शेख (रा. केडगाव, अहिल्यानगर) नावाच्या महिला आरोपीने आमदार संग्राम जगताप यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन वैयक्तिक टीका केली. तसेच हिंदू धर्म आणि धार्मिक श्रद्धांबद्दल अपमानास्पद वक्तव्य केले. अहिल्यानगर शहराच्या नावाचा उल्लेख करून समाजात द्वेष पसरेल असे गंभीर विधानही तिने या व्हिडिओत केले होते.या वादग्रस्त व्हिडिओमुळे अहिल्यानगर शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकत असल्याने पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. पोलीस कॉन्स्टेबल झाडबुके यांच्या तक्रारीवरून आरोपी महिला अफरोज हमीद शेख हिच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात कायदेशीर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारे आणि जातीय सलोखा बिघडवणारे संदेश किंवा व्हिडिओ प्रसारित करू नयेत, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण

## सेन्सेक्स १००० हून अधिक अंकांनी तर निफ्टी ३०० हून अधिक अंकांनी कोसळला

मुंबई - भारतीय शेअर बाजार १८ मे सुरुवातीच्या व्यवहारात बीएसई सेन्सेक्स १००० हून अधिक अंकांनी कोसळला तर, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी ३०० हून अधिक अंकांनी खाली आला. दरम्यान, रुपयानेही डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतचा नीचांक गाठला.

सकाळी ९.५० वाजता मुंबई शेअर बाजार १,०१०.६४ अंक किंवा १.३४% घसरणीसह ७४,२२७.३५ अंकांवर ट्रेड करत होता. त्याचवेळी, निफ्टी५० निर्देशांक ३०३.२५ अंकांनी किंवा १.२८% घसरून २३,३४०.२५ अंकांवर खाली आला. अशाप्रकारे, सुरुवातीच्या घसरणीमुळे BSE वर सूचिबद्ध कंपन्यांचे मार्केट-कॅप ७ लाख कोटींनी कमी होऊन ४५४ लाख कोटी रुपये राहिले.

### डॉलरसमोर रुपयाचा नवीन ऐतिहासिक नीचांक

त्याचवेळी दुसरीकडे, अमेरिकी डॉलरसमोर भारतीय रुपयाची घसरण थांबण्याची चिन्हे दिसत नसून सोमवार पुन्हा एकदा भारतीय चालनाने ऐतिहासिक नीचांकी पातळी गाठली. इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किमती आणि बॉण्ड यील्ड्समध्ये झालेल्या वाढीमुळे रुपयाची शंभरीच्या दिशेने कूच चालू राहिली. सकाळच्या सत्रात रुपया ०.२% घसरून ९६.१८ वर आला असून सलग पाचव्या सत्रात रुपयाने घसरणीचा आलेख कायम ठेवला आहे.

गेल्या वर्षाप्रमाणेच यावर्षी देखील रुपया आशियाई चलनांमध्ये सर्वात खराब कामगिरी करणारे चलन ठरले असून २८ फेब्रुवारी रोजी इराणमध्ये युद्ध सुरू झाल्यापासून डॉलरच्या तुलनेत ५.५% घसरला आहे.

**भिंगार अर्बन को.ऑप.बँक लि.,भिंगार**
मुख्य कार्यालय, नगर-पाथर्डी रोड,भिंगार, अहिल्यानगर-४१४००२
mail id - bucb@bhingarbank.com, www.bhingar.bank.in

**छपाई निविदा सूचना**

बँकेस सन २०२६-२०२७ सालासाठी आवश्यक छपाई करुन घेणे असल्यामुळे व्यावसायीकांकडून सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत.

१) कोरे निविदा फॉर्म रु. १००+१८% जी.एस.टी.रकमेचा भरणा करुन दि.१९/०५/२०२६ ते २५/०५/२०२६ पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत सुट्यांचे दिवस वगळून मुख्य कार्यालय भिंगार येथे मिळतील.
२) छपाईचे कागदाचे नमुने बॅकेच्या नमुन्याप्रमाणे पाहून निविदा सादर कराव्यात. निविदेसोबतच छपाई कागदाचे नमुने सादर करावे लागतील.
३) निविदा सादर करतांना रु.५०००/- अक्षरी रु.पाच हजार मात्र रोख किंवा डी.डी.बँकेच्या अनामत खाती जमा करावे लागतील.व्यवसायाचे जी.एस.टी.रजिस्टेशन आवश्यक राहील.
४) निविदा मंजूर झाल्यास छपाईचे काम वेळेत न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
५) सिलबंद निविदा दि.२६/०५/२०२६ रोजी सायं.४.३० वाजेपर्यंत मुख्य कार्यालयात बँकेच्या कामकाजाच्या वेळेत सादर कराव्यात.त्यानंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.
६) कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

तारीख- १८/०५/२०२६.

श्री.शशीकांत उमाकांत महाजन, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.अनिलराव मधुकरराव झोडगे, चेअरमन

# गृहिणी

## आरोग्य

### प्या लवंगाचे पाणी

रात्री झोपण्यापूर्वी लवंगाचे पाणी पिण्याचे बरेच फायदे आहेत. लवंगामध्ये eugenol नावाचा घटक असतो जो पचनक्रिया सुधारायला मदत करतो, त्यामुळे रात्री जेवणानंतर गॅस किंवा पोटफुगीचा त्रास कमी होतो आणि पोट हलके वाटते. याच्या सौम्य सुगंधाने आणि उष्ण गुणधर्माने मन शांत होते, तणाव कमी होतो आणि झोप चांगली लागते. लवंग antibacterial आणि antioxidant असल्यामुळे सर्दी खोकला लांब राहतो आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते. घसा खवखवत असेल किंवा दात दुखत असेल तर लवंग पाण्याने आराम मिळतो कारण ते तोंडातील बॅक्टेरिया कमी करते. काही अभ्यास असेही सांगतात की ते रक्तातील साखर नियंत्रणात ठेवायला मदत करू शकते. ते बनवायला एक कप पाण्यात दोन-तीन लवंगा पाच मिनिट उकळून कोमट झाल्यावर झोपायच्या अर्धा तास आधी प्यायचे. पण रोज दोन-तीनपेक्षा जास्त लवंगा घेऊ नयेत कारण जास्त झाल्यास पोटात जळजळ होऊ शकते. गरोदर असाल, रक्त पातळ करणारी औषधे घेत असाल किंवा अल्सरचा त्रास असेल तर डॉक्टरांना विचारूनच घ्या. हा फक्त घरगुती उपाय आहे, काही त्रास वाटला तर डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

## पाककला

### केशर पिस्ता फिरनी

**साहित्य :** एक लिटर पूर्ण दुध, पाव वाटी बासमती तांदूळ, अर्धी वाटी साखर, केशराच्या काड्या, वेलची पूड, पिस्ता आणि बदामाचे काप.

**कृती :** सगळ्यात आधी तांदूळ धुवून अर्धा तास पाण्यात भिजत ठेव. नंतर पाणी निथळून तांदूळ मिक्सरमध्ये जाडसर वाटून घ्या. पीठ करायचे नाही, रव्यासारखे बारीक तुकडे राहिले पाहिजेत. आता जाड बुडाच्या पातेल्यात दूध उकळायला ठेवा. उकळी आली की आच कमी करून त्यात वाटलेला तांदूळ घाला. सारखे ढवळत राहावे. दूध आटून निम्मे झाले आणि तांदूळ शिजला की त्यात साखर, केशर आणि वेलची पूड घाला. अजून पाच मिनिट शिजवून गॅस बंद करा. गरम असतानाच मातीच्या वाटीत किंवा भांड्यात काढा आणि वरून पिस्ता बदाम पेरा. पूर्ण थंड झाल्यावर दोन तास फ्रीजमध्ये ठेवा. थंडगार फिरनी खायला तयार आहे.

## वास्तू

### आरसा योग्य ठिकाणी लावा

✻ आरसा मुख्य दरवाजासमोर नसावा. त्यामुळे सकारात्मक ऊर्जा परत जाते असे मानले जाते.

✻ नळातून सतत पाणी गळत असेल तर ते आर्थिक नुकसानाचे प्रतीक मानले जाते.

## सौंदर्य

केमिकलयुक्त शॅम्पू वापरणे टाळावे. मेथी, शिकेकाई आणि आवळा यांसारख्या नैसर्गिक गोष्टी केस चमकदार ठेवतात.

## सल्ला

पुरी किंवा भजी कुरकुरीत होण्यासाठी पिठात थोडा रवा किंवा गरम तेल घालावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १९ मे २०२६

**विनायक चतुर्थी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, मृग ०८।४२, सूर्योदय ०६ वा. २८मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील. व्यवसाय क्षेत्रात अधिकारी व सहकारी नकारात्मक वागतील.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. गृहिणी आज असंतुष्ट राहतील.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करण्याऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल. अजीर्णचा त्रास संभवतो. साहित्य, लेखन यात रस वाटेल.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही. मित्र व स्नेही भेटल्यामुळे आनंदात असाल.

**कन्या** : रागावर आज संयम ठेवावा लागेल. खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण त्रासदायक राहील.

**तूळ** : आज नवीन कामे सुरू करू नका. नवे परिचय सुद्धा लाभदायी होणार नाहीत. सरकार विरोधी कारवायांपासून दूर राहणच आज फायदेशीर होईल.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल. मातेचे स्वास्थ्य बिघडू शकते.


**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा- वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल. धन आणि किर्तीची हानी होईल. प्रतिस्पर्ध्यांपासून सावध राहा. आरोग्याची काळजी घ्या.

**मकर** : हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता. आपल्या सर्जनशील व कलात्मक वैशिष्ट्यांना प्रेरणा मिळेल.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे. कामात सांभाळूनच पुढे चला.

**मीन** : जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. सांसारिक किंवा इतर प्रश्नांमुळे मन उदास राहील.

## शब्दगंध क्र. ७४३२ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव ५) चालू काळात; वर्तमान स्थितीत ७) उंचसखल नसलेले; सपाट ८) विष्णूचा पाचवा अवतार; बुटका माणूस ९) एक पक्षी; कावळा; काग; वायस १०) विश्वास; भरवसा ११) महिना; माहे १२) नेहमी; हमेशा १४) टोकदार; नोकदार १७) गव्हाचे कणीदार पीठ १८) लग्नातील नवरदेवाकडील मंडळी २०) आश्चर्य २२) तमाशात काम करणारा

**उभे शब्द :-** १) नासलेला; सडलेला २) नाव देण्याचा विधी; बारसे वगैरे ३) एक विषम संख्या; तिळाचा एक दाणा वाटून खाल्लेल्या भावांची संख्या ४) बोलताना किंवा गाताना काढलेला लांबट सूर; मजुरी; हमाली ५) एकरूप; तादात्म्य ६) चिंतन, मनन; चित्त एकाग्र करण्याची क्रिया ८) वायू वारा; पवन १०) लोकसभा किंवा राज्यसभेचा सभासद ११) किल्ल्याभोवतालची जमीन; डोंगरावरचा सपाट प्रदेश १३) जंगलाला लागलेली आग; वणवा १४) गायनातील एक रागिणी १५) भांडण उकरून काढणे; खुसपट १६) पाठवणी १९) माफी २१) नवरा मुलगा; आशीर्वाद

शब्दगंध क्र. ७४३१ चे उत्तर

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : वेळ आणि नशीब बदलायला वेळ लागत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पृथ्वी गोल असूनही आपण खाली का पडत नाही?

पृथ्वीचा आकार नारंगासारखा गोल आहे हे विज्ञानाने सिद्ध केले आहे. तरीही आपण उभे राहतो, चालतो, घरे बांधतो आणि एकदाही असे वाटत नाही की आपण अवकाशात पडू. यामागचे मुख्य कारण म्हणजे गुरुत्वाकर्षण शक्ती. सतराव्या शतकात सर आयझॅक न्यूटन यांनी हे तत्व मांडले. त्यांच्या मते विश्वातील प्रत्येक वस्तू दुसऱ्या वस्तूला स्वतःकडे ओढते. या ओढण्याच्या शक्तीला गुरुत्वाकर्षण म्हणतात. वस्तूचे वस्तुमान जितके जास्त, तितकी तिची ओढण्याची शक्ती जास्त असते. पृथ्वीचे वस्तुमान प्रचंड असल्यामुळे तिची ओढण्याची शक्तीही खूप जास्त आहे. ही शक्ती नेहमी पृथ्वीच्या केंद्राकडे काम करते. म्हणून आपल्यासाठी 'खाली' ही दिशा म्हणजेच पृथ्वीच्या केंद्राची दिशा ठरते. 'खाली' आणि 'वर' या कल्पना सापेक्ष आहेतफ अवकाशात 'वर' किंवा 'खाली' असे काही नसते. या दिशा आपण पृथ्वीवर राहून ठरवल्या आहेत. आपण जिथे उभे आहोत तिथून पृथ्वीचे केंद्र ज्या दिशेला आहे ती दिशा आपल्यासाठी 'खाली' असते आणि त्याच्या विरुद्ध दिशा 'वर' असते. पृथ्वीच्या दुसऱ्या टोकाला, म्हणजे अमेरिकेत किंवा ऑस्ट्रेलियात उभ्या असलेल्या व्यक्तीसाठीही त्यांच्या पायाखालची दिशा म्हणजेच पृथ्वीचे केंद्र हीच 'खाली' असते. म्हणून त्यांना आपण उलटे वाटत नाही आणि त्यांनाही आपण उलटे वाटत नाही. प्रत्येकजण स्वतःच्या जागेवरून सरळच उभा असतो.

सोपे उदाहरण एका मोठ्या चुंबकाचा गोल घ्यावा आणि त्यावर लहान लोखंडी पिना सर्व बाजूंनी चिकटवाव्यात. सर्व पिना गोलाच्या पृष्ठभागाला चिकटून राहतील आणि त्यांचे टोक गोलाच्या केंद्राकडे असेल. कोणतीही पिन 'खाली' पडणार नाही कारण चुंबक सर्व पिनांना आपल्या केंद्राकडे ओढत आहे. पृथ्वीचे गुरुत्वाकर्षणही अगदी तसेच काम करते. ती आपल्याला, समुद्राला, हवेला आणि सर्व वस्तूंना आपल्या केंद्राकडे ओढून धरते.

पृथ्वी स्वतःभोवती खूप वेगाने फिरते. विषुववृत्तावर तिचा वेग ताशी सुमारे १६७० किलोमीटर इतका असतो. तरीही आपल्याला हा वेग जाणवत नाही कारण आपण, हवा आणि पृथ्वीवरील सर्व गोष्टी याच वेगाने पृथ्वीबरोबर फिरत आहोत.

चालत्या रेल्वेत बसल्यावर आपण चेंडू वर टाकला तर तो आपल्या हातातच पडतो, मागे जात नाही. कारण चेंडूही रेल्वेच्या वेगानेच पुढे जात असतो. तसेच पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे आपण तिच्याबरोबरच फिरत असल्याने आपल्याला तिची गती जाणवत नाही आणि आपण खाली पडत नाही.

जर पृथ्वीने ओढण्याची शक्ती बंद केली असती तर समुद्राचे पाणी, हवा, माणसे, प्राणी सर्वकाही अवकाशात तरंगायला लागले असते. पृथ्वीवर सजीवसृष्टी टिकूच शकली नसती. म्हणून गुरुत्वाकर्षण ही पृथ्वीवरील जीवनासाठी अत्यंत आवश्यक शक्ती आहे. थोडक्यात, पृथ्वी गोल असली तरी तिच्या केंद्राकडे ओढणाऱ्या गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे आपण तिच्या पृष्ठभागावर सुरक्षितपणे उभे राहू शकतो. 'खाली पडणे' ही कल्पनाच पृथ्वीच्या संदर्भात तयार झाली आहे आणि ती दिशा नेहमी पृथ्वीच्या केंद्राकडे असते.

## एकजूट

फार पूर्वीची गोष्ट आहे. एका हिरव्यागार जंगलात चार देखणे बैल राहत होते. त्यांची नावे होती धवल, कपिल, चित्तर आणि श्यामल. चौघेही सख्ख्या भावांसारखे एकत्र राहायचे. सकाळ झाली की एकत्रच कुरणात चरायला जायचे. दुपारी एकाच झाडाच्या सावलीत विसावा घ्यायचे आणि संध्याकाळी एकत्रच पाणवठ्यावर पाणी प्यायला जायचे. त्यांची एकजूट इतकी घट्ट होती की जंगलातील कोणताच हिंस्र प्राणी त्यांच्या वाटेला जायला धजावत नव्हता. त्याच जंगलात एक म्हातारा सिंह राहत होता. वयामुळे त्याला शिकार करणे जड जाऊ लागले होते. त्याची नजर त्या चारही धष्टपुष्ट बैलांवर होती. त्याने अनेकदा त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण जसा तो जवळ यायचा, तसे चारही बैल एक गोल करून उभे राहायचे. त्यांची शिंगे बाहेरच्या बाजूला रोखलेली असायची. सिंह कोणत्याही बाजूने आला तरी त्याला शिंगांचा सामना करावा लागायचा. शेवटी कंटाळून सिंहाला परत फिरावे लागे.

तो विचार करू लागला, जोपर्यंत हे चौघे एकत्र आहेत, तोपर्यंत माझे पोट भरणे शक्य नाही.एके दिवशी सिंहाला एक धूर्त कोल्हा भेटला. सिंहाने त्याला आपली समस्या सांगितली.

कोल्हा हसून म्हणाला, महाराज, ताकदीने नाही तर बुद्धीने काम घ्या. या बैलांची एकजूट तोडा म्हणजे ते तुमचे सहज भक्ष्य बनतील. सिंहाला ही युक्ती पटली. त्याने कोल्ह्याला कामाला लावले.कोल्हा प्रथम धवल बैलाला एकट्यात गाठून म्हणाला, तू इतका गोरा आणि देखणा आहेस, पण बघ कपिल किती गर्विष्ठ आहे. तो नेहमी म्हणतो की कुरणातील हिरवे गवत फक्त माझ्यासाठी आहे. धवलला राग आला. नंतर कोल्हा कपिलाकडे गेला आणि म्हणाला, चित्तर तुझ्या पाठीमागे तुझी निंदा करतो. म्हणतो की कपिल फक्त खायला हुशार आहे, कामाच्या वेळी मागे राहतो. असे करत कोल्ह्याने चौघांच्याही मनात एकमेकांबद्दल संशयाचे बी पेरले.हळूहळू त्यांचे एकत्र येणे बंद झाले. आता प्रत्येकजण वेगळ्या दिशेला चरायला जाऊ लागला. त्यांच्यात बोलणेही बंद झाले. एकमेकांकडे पाहिले तरी रागाने पाहू लागले.

सिंह हीच संधी वाट पाहत होता. एके दिवशी धवल एकटाच नदीकाठी चरत होता. सिंहाने दबक्या पावलांनी येऊन त्याच्यावर झडप घातली. धवलने मदतीसाठी आरडाओरडा केला, पण बाकीचे तिघे आले नाहीत. त्यांना वाटले, तो उगाच नाटक करतोय. अशा प्रकारे सिंहाने एकेक करून चारही बैलांना ठार केले.

बोध : एकजुटीचे बळ फार मोठे असते. जिथे प्रेम आणि विश्वास असतो तिथे शत्रूही घाबरतो. परंतु जेव्हा आपापसात फूट पडते, गैरसमज वाढतात, तेव्हा दुर्बल शत्रूसुद्धा आपला घात करू शकतो. म्हणून कधीही कानगोष्टींवर विश्वास ठेवू नये आणि आपल्या माणसांची साथ सोडू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



### हमारा अस्तित्व

मेरी शुभकामनाएँ सदा आपके साथ हैं।जब तक हम अंतर में आत्मा का अनुभव नहीं पाते, हम घोर अँधकार में रहते हैं। किताबी ज्ञान एक सिरदर्द बन जाता है, क्योंकि इसकी वजह से मन, इंद्रियों के द्वारा संसार में फैला रहता है और लगातार संसार से जुड़े

रहने की वजह से, हम अपने आप को इंद्रियों के घाट पर ही पाते हैं। इसके विपरीत आत्मज्ञान, आत्मा की शांति और खुशी पाने की जन्मजात भूख को शांत कर देता है। हमें इंसान की किताब को पढ़ने की जरूरत है, क्योंकि स्वयं मानव का अध्ययन ही सबसे ऊँचा अध्ययन है।

५४. कृपया लगातार चलते रहो, ताकि दिन-ब-दिन तरक्की करो और परलोक के सच्चे आनंद और शांति का लुत्फ उठाओ। आप सदा मेरे ख्यालों में हैं। जीवन मुश्किलों, परेशानियों से भरा है। आपको मेहनत करके उन्हें पार करना है, ताकि हमारे कर्मों का हिसाब चुकाया जा सके। कृपया ऐसा खुशी-खुशी करें। आपके पीछे महान गुरु-सत्ता है, आपको हर संभव सहायता और संरक्षण देती हुई। वह सत्ता आपको कभी नहीं छोड़ेगी, संसार के अंत तक ।

५५. किताबों को पढ़ना अच्छा है। पर उनको पढ़ने का उद्देश्य है कि हम अपनी जिंदगी को इस प्रकार ढालें कि जिस अच्छाई के बारे में हम पढ़ते हैं, वह हमारी जिंदगी का हिस्सा बन जाए।

५६. क्योंकि हमारा अस्तित्व है, अतः हम जीवन की प्रक्रिया को समझना चाहते हैं। हम कैसे और क्यों अस्तित्व में आए और मौत के बाद क्या होता है ? आधुनिक विज्ञान द्वारा प्रतिपादित विकासवाद का सिद्धांत हमें पूरी तरह संतुष्ट नहीं कर पाता है, क्योंकि यह सिर्फ भौतिक मंडल के बारे में बताता है और उच्चतर या आध्यात्मिक मंडलों का

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### इतरांचे म्हणणे ऐकणे

समजा, आजच्या कामाच्या यादीत तुम्हाला मीटिंग आहे. त्याच यादीत एक रकाना वाढवा आणि त्या मीटिंगमध्ये तुम्ही कसे असणार आहात ते लिहा. तुमची टू-बी लिस्ट काय असेल ?

सुरेश ओबेरॉय मी पूर्णतः शांत आणि प्रेमळ असेन.

शिवानीदीदी : बरोबर. आपण मीटिंगमध्ये कसे असू याचं चित्र डोळ्यांसमोर मी शांत राहीन. याचा अर्थ, माझ्या आणावं लागेल. आपण ठरवू शकतो सूचना स्वीकारल्या गेल्या नाहीत तरी मी शांत राहीन आणि माझ्या विचारांतही अस्वस्थता नसेल. माझं कितीही बरोबर असलं तरीही इतरांनी माझ्या सूचना लवकर स्वीकाराव्यात अशी अपेक्षा मी करणार नाही, मी स्थिर राहीन. मी प्रेमळ राहीन. - इतरांशी सहमत नसलो तरीही मी त्यांचं म्हणणं प्रेमाने ऐकेन कारण त्यांचं म्हणणं कदाचित त्यांच्या दृष्टिकोनातून बरोबर असेल.

नम्र राहीन माझ्या कल्पना स्वीकारल्या गेल्या नाहीत तरी मी त्यांच्या विरुद्ध मनात कोणतीही अढी ठेवणार नाही. मला सगळ्यांचा मान राखायचा आहे. आता आपली टू-बी लिस्ट तयार आहे.

सुरेश ओबेरॉय एक व्यक्ती निर्णय घेऊ शकते पण इतरांना तो पाळावाच लागेल.

शिवानीदीदी टू-बी लिस्ट स्वतःकडे असणं म्हणजे कोणालाही काहीही करायची परवानगी देणं असं नाही. पण जेव्हा इतर लोक त्यांची मतं मंडत असतात तेव्हा आपण संयम राखणं गरजेचं असतं. आज आपल्याकडे संयम इतका कमी आहे की, दुसऱ्या व्यक्तीने तिचं मत मांडायच्या आधीच, आपण आपलं मत मांडतो. कारण आपलं मत आणि कल्पना बरोबरच आहेत असं आपण गृहीत धरतो. याच कारणामुळे, मीटिंगमध्ये

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, तुम्ही लग्नाआधी मला चांद-तारे तोडून आणतो म्हणायचे.

नवरा : अगं, तेव्हा निवडणूक चालू होती ना!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ पहिली जागतिक मुकबधीर टि-२० क्रिकेट स्पर्धा कोणत्या राज्यात भरली होती? - केरळ

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कारली

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार कारली पित्तशामक, वातानुलोमक, कुमीघ्न व मूत्रल आहेत. कारल्याची पाने ज्वरनाशक, कृमीनाशक व मूत्रल आहेत.

आधुनिक शास्त्रानुसार कारल्यामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस, अ व क जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात, तर ब जीवनसत्त्व थोड्या प्रमाणात असते. या सर्व औषधी गुणधर्मांमुळे कारले शक्तिवर्धक, पुष्टीकारक व सारक असल्यामुळे औषध म्हणूनही वापरतात.

उपयोग :

१) कारल्याच्या पानांचा तीन चमचे रस एक ग्लासभर ताकातून रोज दुपारी महिनाभर घेतल्यास मूळव्याधीचा त्रास कमी होतो, तसेच यासोबत कारल्याची मुळे स्वच्छ धुऊन वाटून त्याचा कोंबावर लेप लावल्यास मूळव्याधीचे कोंब नाहीसे होतात.

२) खरूज, खाज, नायटे, चट्टे अशा त्वचाविकारांवर कारल्याचा कपभर रस नियमितपणे घेतल्याने रक्तदोष कमी होऊन रक्तशुद्ध होते व पर्यायाने त्वचाविकार कमी होतात.

३) मधुमेह झालेल्या रुग्णांनी कोवळ्या कारल्याचे बारीक काप करून ते उन्हामध्ये सुकवून त्याचे बारीक चूर्ण करावे. हे चूर्ण दररोज सकाळ, संध्याकाळ पाच-पाच ग्रॅम नियमितपणे घ्यावे. यामुळे साखर नियंत्रणात राहून मधुमेह हा आजार आटोक्यात राहतो.

४) शरीरामध्ये जंत-कृमी झाले असतील, तर कारल्याच्या पानांचा रस कपभर नियमितपणे आठ दिवस घ्यावा. यामुळे सर्व कृमी शौचावाटे पडून जातात.

५) दारू पिण्याच्या सवयीची चटक लागली असेल, ती हानी भरून काढण्यासाठी व दारूचे व्यसन सोडण्यासाठी कारल्याच्या पानांचा रस रोज सकाळ-संध्याकाळ कपभर घ्यावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘साहित्य, त्यातील कथा, कादंबरी आणि काव्य’ हे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांचा समाज मनाचा आरसा असते

### समाज मनाचा आरसा असलेल्या काव्य सादरीकरणाने रसिक भारावले, जिल्हा वाचनालयाच्या व्याख्यानमालेत कवयित्री अनघा तांबोळी यांच्या काव्याने दुसरे पुष्प रंगले

नगर – साहित्य, त्यातील कथा, कादंबरी, काव्य हे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांचा समाज मनाचा आरसा असते. जे ऐकताना आपण त्यात हरवून जातो त्यातील आनंद दुःख प्रेम विरह आपलेसे वाटते ते खऱ्या अर्थाने वाचकांच्या हृदयात स्थान निर्माण करून राहते असा आशावाद मुंबईच्या कवयित्री अनघा तांबोळी यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या.




अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेत मुंबईच्या कवयित्री अनघा तांबोळी यांचे काव्य सादरीकरण करून दुसरे पुष्प गुंफले. यावेळी रसिक नगरकर उपस्थित होते. (छाया – सुरेश मैड)

याप्रसंगी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, डॉक्टर राजा ठाकूर, राहुल तांबोळी, प्रा. ज्योती कुलकर्णी, संयोजिका शिल्पा रसाळ, संचालक किरण आगरवाल, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारतात, पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते. दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घडामोडींवर भाष्य करताना प्रत्येकाला अंतर्मुख करणाऱ्या काव्यरचना अनघा तांबोळी यांनी सादर केल्या.

‘कॉमन मॅन’ ही रचना सादर करताना सामान्य मध्यमवर्गीयांची रोजची जीवन जगण्याची धडपड व चाकोरीबद्ध मानसिकता यावर भाष्य केले. नव्या युगातील एकलव्य या विडंबन पर काव्यरचनेतून शिक्षण व्यवस्था त्याचे, बाजारीकरण, स्पर्धा शॉपिंग, भाषा, संध्याकाळ, जनरेशन गॅप, मैफील अशा वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करत उपस्थितीतांच्या हृदयाचा ठाव घेणाऱ्या काव्य मैफिनेतून रसिक नगरकरांची मने जिंकली. कार्यक्रमाचे औचित्य साधून वाचन संस्कृती पुढे घेऊन जाण्यासाठी कार्य करणारे हॉबी क्लब चे समन्वयक आर्टिस्ट ज्ञानेश शिंदे यांचा वाचनालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक प्रा. ज्योती कुलकर्णी सत्कार शिल्पा रसाळ यांनी केले. राहुल तांबोळी यांनी आभार मानले. यावेळी रसिक नगरकर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हा वाचनालयातील कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.


व त्यातून बाहेर पडणारी तरुण पिढी याबाबत चिंता व्यक्त करणारे विवेचन केले. पंढरपूरची वारी या काव्य गायनातून उपस्थित रसिकांनी ही कवयित्री तांबोळी यांच्या सुरात सूर मिसळवीत गीतांचा ठेका धरला.

सेल्फी या आधुनिक तंत्रज्ञानावर सादरीकरण करताना सेल्फी काढावी कधीतरी, पडावं स्वतःच्या प्रेमात, पहावं देवानं दिलय त्यातलं उरलं काही त्यातया ओळींनी स्त्री अंतर्मनाचा ठाव घेतला. कवितांच्या याप्रवासात

# प्रेरणादायी अक्षरधन

## मनाचे सौंदर्य

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




माझे मत पक्के, मग मी ‘वाः सुंदर’ म्हणून मारतो शिक्के. म्हणून खरंच का ते असते सुंदर शंभर टक्के?

रे माणसा, वस्तू मुळातच का सुंदर असते? अरे, नसते कोणतीही वस्तू मुळातच कुरूपदेखील. आवडली तर सुंदर वाटते, नाहीतर कुरूप म्हणून अडगळीत पडते. ज्याची त्याची आवडच वेगवेगळी असते; पण कित्येकांना सगळेच सुंदर दिसते, तर एखाद्याला सगळेच कुरूप भासते. आपल्या मनाचे खेळंच हे. सौंदर्य मनात असते. डोळ्यातून बाहेर पडते. जिभेवर अवतरते, म्हणून ‘मन’च सुंदर असावे लागते. मळलेल्या आरशात तोंड कुठे चांगले दिसते? मळक्या मनाला तरी कुठे सौंदर्य भावते? सगळे जगच कुरूप वाटते, मग मन आनंदाला मुकते. सदैव दुर्मुखलेले जगते. जगते? छे, कुढते. मृत्यूच अनुभवते.

मन मूळचे का मलिन? छे, ते स्वच्छ कलंकहीन; पण कधी कधी जडतो विकार त्याला. माणसाचा स्वार्थ बाधतो मनाला. मत्सरापायी मग मनाचा नूर पालटला, की कुरूपता आलीच त्याला. असे बाहेरचे बाधते, मन गढुळते. चांगला पांढरा शुभ्र शंख, पण त्याला पिवळा म्हणते. सुखाचाही दुःखद अनुभव घेते. म्हणून या बाहेरच्या तामसी दुर्गुणांची त्याला बाधा होऊ नये. झाली तरी तिच्या अधीन असू नये. असलात तरी वागण्यावर त्याचा परिणाम घडू नये. त्यासाठी विकाराधीन मनाला विवेकाने स्वाधीन ठेवायला चुकू नये.

मनाला वळणच लावले पाहिजे. वस्तूतले सौंदर्य टिपण्याची कला त्याला शिकवली पाहिजे. बाह्य रूपावरून अंतर्गत स्वरूपाची कल्पना करणे हे मूर्खपणात गणणे, ते मनावर बिंबवणे. असे संस्कार मनावर नसले, तर जगातले सगळे सौंदर्यच नासले. या संस्कारांनाच पुण्य म्हणतात.

असे पुण्य गाठीला असले, तर पांडुरंगाचे बळ पाठीशी उभे राहते. अंतर्गत सौंदर्य पाहायला मन तत्पर असते. काळ्या विठोबाचे मनाचे सौंदर्य त्याला चटकन भावते. विठोबाच्या मनातले प्रेम त्याला सुखवून जाते.

एकदा जनक राजाने राज्यातल्या पंडितांची सभा बोलावली. राज्यातले थोर तत्त्वज्ञ, पंडित आणि वेदोपनिषदांचे गाढे अभ्यासक सभेत विराजमान झाले. सभा सुरू होणार, तोच एक पंडित सभागृहाच्या दाराशी आला. त्याला उशीर झाला होता. तो लंगडत आला. त्याला चालणे जड होत होते. कारण तो शरीरातच आठ ठिकाणी वाकलेला होता. इतका. वेडावाकडा म्हणूनच त्याला ‘अष्टावक्र’ म्हणत असत. त्याचे ते रूप पाहिले आणि सभा त्याला हसली. अष्टावक्र संतापला. आल्या पावली परतला. आता सभेतल्या विद्वानांना राग आला. त्यांचा अपमान झाला. अष्टावक्र त्यांचा अनादर करून निघून गेला होता. त्या विद्वानांनी जनकाला विनंती केली, की अष्टवक्राला बोलवा आणि शिक्षा सुनवा. जनक स्थितप्रज्ञ व जाणकार होता. त्याने विद्वानांचे म्हणणे ऐकले. अष्टवक्राला परत बोलावले आणि सर्वांदेखत त्याला आपल्या अर्ध्या सिंहासनावर बसविले.

विद्वानांची सभा आता खवळलीच. राजा, हा विद्वानांचा अपमान आहे. म्हणून गरजली. अष्टावक्र म्हणाला, राजा हे कुठले विद्वान? हे तर केवळ चामड्याची परीक्षा करणारे चर्मकार. माझे ज्ञान पारखण्याचे कुठले यांना भान?

पण जनकाने ते जाणले होते. पुढे विद्वानांनी चर्चा केली, त्यात अष्टवक्राचे ज्ञान झळाळले. सगळे विद्वान अष्टावक्रमुढे कुंठितमती झाले. अष्टावक्राचे बुद्धिसौंदर्य त्यांना दिपवून गेले.

– किशोर गांधी

# नगरमध्ये २१ मे रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी २१ मे रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नगर शहरात तारकपूर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी प्रसिध्द हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात तपासणी करून घ्यावी.

नगरमधील शिबिरासाठी ०२४१–२३२५६४८ या क्रमांकावर नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# महिलेचा विनयभंग केल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर – वडिलोपार्जित जागेवरून सुरू असलेल्या वादात वाद मिटवण्यासाठी गेलेल्या फिर्यादीचा हात धरून फिर्यादीस आरोपी म्हणाला की, तू मला फार आवडतेस, तू माझ्यासोबत रहा. तुला काहीही त्रास होऊ देणार नाही. तसेच फिर्यादीच्या पतीस आरोपीने शिवीगाळ व मारहाण केली. अशा मजकुराची फिर्याद कोतवाली पोलीस स्टेशन येथे भारत बाबुराव कदम, रा.रेल्वे स्टेशन, अ.नगर यांच्याविरुद्ध नोंदवण्यात आली होती. त्यानुसार भारत कदम याच्याविरुद्ध बी.एन.एस चे कलम ७४,११५ (२),३५२, व ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपासी अधिकारी यांनी तपास करून अ.नगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले होते. त्यानुसार न्यायालयात सरकार पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदार तपासण्यात आले. सर्व साक्षीदारांनी न्यायालयासमोर आपआपले जबाब नोंदवले. त्यावेळी आरोपीच्या वकिलांनी सर्व साक्षीदारांचा उलटतपास घेतला. सदर उलटतपासाअंती साक्षीदारांच्या जबाबातील विसंगती आरोपीच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच आरोपीच्या वकिलांनी केलेल्या अभ्यासपुर्ण युक्तीवादामुळे व आरोपीचा घेतलेला बचाव न्यायालयाने ग्राह्य धरून आरोपीची निर्दोष मुक्तता केलेली आहे. आरोपीच्या वतीने ॲड.आर.यु. बनकर व ॲड. वैभव अनुरथ कदम यांनी न्यायालयात बाजू मांडली.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाअंतर्गत २९ मे रोजी पारंपरिक वेशभूषा स्पर्धा

### दिल्लीगेट ते छत्रपती संभाजी महाराज पुतळ्यापर्यंत निघणाऱ्या शोभायात्रेत स्पर्धकांचा सहभाग

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवा अंतर्गत २९ मे रोजी पारंपरिक वेशभूषा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या विविध महान व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषेत स्पर्धक सहभागी होणार असून शहरात पारंपरिक संस्कृतीचा अनोखा उत्सव रंगणार आहे.

ही स्पर्धा दोन गटांमध्ये आयोजित करण्यात आली असून शालेय वयोगट (इयत्ता दहावीपर्यंत) तसेच खुला गट अशा स्वरूपात स्पर्धा पार पडणार आहे. स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, झाशीची राणी, राजमाता जिजाऊ, डॉ. आनंदीबाई जोशी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, मुक्ताबाई, कान्होपात्रा, जनाबाई, बहिणाबाई, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, मल्हारराव होळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, वासुदेव बळवंत फडके, भगतसिंग, नेताजी सुभाषचंद्र बोस आदी महान व्यक्तिमत्त्वांचे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

स्पर्धकांनी दिल्ली गेट येथून प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्यापर्यंत निघणाऱ्या शोभायात्रेमध्ये सहभागी व्हायचे असून पारंपरिक वेशभूषा, ऐतिहासिक सादरीकरण आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविण्यात येणार आहे. या शोभायात्रेमुळे शहरात ऐतिहासिक व सांस्कृतिक वातावरण निर्माण होणार असून नागरिकांना महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेची अनुभूती मिळणार आहे.

अधिक माहितीसाठी स्पर्धकांनी ९४२२२२१५३२, ८८३०१५९०८३, ९८९०२६९६९८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पालकमंत्री महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# फ्रेंड्स कॉर्पोरेट टी–२० क्रिकेट लीगमध्ये ‘नगर चॅम्पियन्स’चा विजय

### सुनील आगरकरच्या शतकाच्या जोरावर अहमदनगर डिस्ट्रिक्ट सिनियर्सवर २६ धावांनी मात



फ्रेंड्स कॉर्पोरेट टी–२० क्रिकेट लीगमध्ये नगर चॅम्पियन्स संघाने दणदणीत विजय मिळविला.

नगर – फ्रेंड्स कॉर्पोरेट टी–२० क्रिकेट लीग स्पर्धा जल्लोषात पार पडलेल्या अंतिम सामन्याने संपन्न झाली. वाकोडी येथील साईदीप क्रिकेट अकादमीच्या मैदानावर झालेल्या रंगतदार अंतिम लढतीत नगर चॅम्पियन्स संघाने अहमदनगर डिस्ट्रिक्ट सिनियर्स संघावर २६ धावांनी विजय मिळवत विजेतेपद पटकावले. संपूर्ण स्पर्धेत उत्कंठावर्धक सामने, दमदार फलंदाजी आणि अचूक गोलंदाजी यामुळे क्रिकेटप्रेमींना मेजवानी मिळाली. अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडवले. मात्र निर्णायक क्षणी नगर चॅम्पियन्स संघाने सर्वच आघाड्यांवर सरस कामगिरी करत विजेतेपदावर नाव कोरले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत नगर चॅम्पियन्स संघाने निर्धारित २० षटकांत ६ बाद २१५ धावांचा डोंगर उभा केला. संघाच्या डावाचा कणा ठरलेल्या सुनील आगरकर यांनी तुफानी आणि प्रेक्षणीय फलंदाजी करत १३७ धावांची झंझावाती खेळी साकारली. त्यांच्या खेळीत आकर्षक चौकार आणि षटकारांची आतषबाजी पाहायला मिळाली. त्यांच्या या दमदार शतकाच्या जोरावर नगर चॅम्पियन्स संघाने प्रतिस्पर्धी संघासमोर मोठे आव्हान उभे केले.

२१६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना अहमदनगर डिस्ट्रिक्ट सिनियर्स संघाने देखील चांगला प्रतिकार केला. फलंदाजांनी संयमी आणि आक्रमक खेळाचे मिश्रण सादर करत धावफलक हलता ठेवला. मात्र नगर चॅम्पियन्सच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत प्रतिस्पर्धी संघाला मोठी भागीदारी उभारू दिली नाही. निर्धारित २० षटकांत अहमदनगर डिस्ट्रिक्ट सिनियर्स संघाला ४ बाद १८९ धावांपर्यंतच मजल मारता आली आणि नगर चॅम्पियन्स संघाने २६ धावांनी विजय मिळवला.

अंतिम सामन्यातील तुफानी शतकी खेळीसाठी सुनील आगरकर यांना सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि प्रभावी फलंदाजी केल्याबद्दल त्यांनाच उत्कृष्ट फलंदाज पुरस्कारही प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट गोलंदाज म्हणून भाऊ काकडे यांनी मानाचा किताब पटकावला. तर संपूर्ण मालिकेत अष्टपैलू आणि सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या तेजस करमरकर यांना मालिकावीर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून भारत पवार उपस्थित होते. त्यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करत अशा स्पर्धांमुळे खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचे सांगितले. तसेच खेळाडूंनी खेळभावना जपत मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी साईदीप क्रिकेट अकादमीचे संचालक संदीप घोडके उपस्थित होते. त्यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सहभागी संघ, खेळाडू, पंच, आयोजक आणि क्रिकेटप्रेमींचे आभार मानले.



न्यू आर्ट्स कॉलेजमधील फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमातील विद्यार्थी ओम बोरगे याची जर्मनीतील ड्युएल डिग्री प्रोग्रॅमसाठी निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

# न्यू आर्ट्स कॉलेजमधील फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमातील विद्याथी ओम बोरगे याची जर्मनीतील ड्युएल डिग्री प्रोग्रॅमसाठी निवड


नगर – अहिल्यानगरमधील जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज या महाविद्यालयातील इयत्ता बारावी एफ पी टी फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमातील ओम राजेंद्र बोरगे या गुणवंत विद्यार्थ्यांची पुढील उच्च शिक्षणासाठी जर्मनी येथील ड्युअल डिग्री प्रोग्रामसाठी निवड झाली आहे. विशेष बाब म्हणजे या आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या दरम्यान त्याला चांगले रकमेचे विद्यावेतन ही मिळणार आहे. या लक्षवेधी यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर बाळासाहेब सागडे आणि उपप्राचार्य प्रा. कल्पना दारकुंडे यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या निवडीच्या प्रक्रियेत त्याला वर्गशिक्षिका व विभाग प्रमुख प्रा. तांबे पी. एस. यांचे मार्गदर्शन लाभले.

याप्रसंगी विद्यार्थ्याची आई सौ. मंदा बोरगे या सुद्धा उपस्थित होत्या.

या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर व सेक्रेटरी विश्वासराव आठरे पा., सहसेक्रेटरी महेश मुळे, विश्वस्त ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, नंदकुमार झावरे, जी. डी. खानदेशे, सिताराम खिलारी, जयंत वाघ, चंद्रकांत मोरे तसेच प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्याचे हार्दिक अभिनंदन करून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अहिल्यानगर येथील आदित्य क्षीरसागर यांची थर्ड डॅन ब्लॅक बेल्ट परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी




नगर – बारामती येथे १६ व १७ मे रोजी पार पडलेल्या डॅन ग्रेडेशन परीक्षेमध्ये अहिल्यानगर येथील कराटे प्रशिक्षक सेन्सेई आदित्य क्षीरसागर यांनी उल्लेखनीय यश संपादन करत थर्ड डॅन बेल्ट परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे.

आदित्य क्षीरसागर हे अचिव्हर्स स्पोर्ट्स अॅकॅडमीचे संस्थापक व प्रशिक्षक असून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना कराटेचे प्रशिक्षण देत राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडविण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी कराटे क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा थर्ड डॅन ब्लॅक बेल्ट हा टप्पा गाठला आहे. ही परीक्षा ट्रॅडिशनल शोतोकान ॲण्ड स्पोर्ट्स कराटे ऑर्गनायझेशन (टी.एस.एस.के.ओ इंडिया) चे अध्यक्ष शिहान रवींद्र करळे तसेच टेक्निकल डायरेक्टर शिहान विनय बोढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यावेळी बारामती येथील शरयू फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. शर्मिला (वहिनीसाहेब) पवार यांच्या हस्ते आदित्य क्षीरसागर यांना ब्लॅक बेल्ट, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

# राज्य गुणवत्ता यादीत नगर येथील वेदांत राहिंज याची झेप; भारत टॅलेंट सर्च परीक्षेतून इस्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड

### वेदांत राज्यात द्वितीय क्रमांक तर संस्कृती वायकर हिने जिल्ह्यात तिसरा क्रमांक प्राप्त करत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचा फडकावला झेंडा



नगर – NEP 2020 नुसार जीवनभिमुख शिक्षण देणारे पहिले पाऊल..!! हे ब्रीद घेऊन एज्यूमिट अकॅडमी, महाराष्ट्र राज्य आयोजित भारत टॅलेंट सर्च (BTS) राज्यस्तरीय परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यालयातील इयत्ता चौथीचा विद्यार्थी वेदांत वैभव राहिंज याने १५० पैकी तब्बल १४६ गुण मिळवत राज्य गुणवत्ता यादीत निकषानुसार द्वितीय क्रमांक तर संस्कृती रविंद्र वायकर हिने इयत्ता पहिलीत जिल्ह्यातून तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. मार्च २०२६ मध्ये पार पडलेल्या या राज्यस्तरीय परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत वेदांतने राज्यस्तरीय इस्रो शैक्षणिक सहलीच्या बक्षिसाचा मान पटकावला आहे.

भारत टॅलेंट सर्च परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा, तार्किक विचारशक्तीचा व शैक्षणिक प्रगतीचा शोध घेणारी राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा मानली जाते. या परीक्षेमध्ये इयत्ता पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. राज्यस्तरावरील प्रथम तीन गुणवंत विद्यार्थ्यांना एज्यूमिट अॅकॅडमीच्या वतीने भारतीय अवकाश संशोधन संस्था (ISRO) येथे शैक्षणिक भेट आयोजित केली जाते. या सहलीचा संपूर्ण खर्च अकॅडमीकडून केला जातो. तसेच जिल्हा व केंद्रस्तरीय गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

वेदांत आणि संस्कृतीच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक, वर्गशिक्षक, मार्गदर्शक शिक्षक तसेच पालकांनी अभिनंदन केले आहे.

# बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपीची अटकेनंतर अवघ्या दोन तासांत न्यायालयातून मुक्तता


नगर – पारनेर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या एका बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपीला अटकेनंतर अवघ्या दोन तासात न्यायालयाने जामिनावर मुक्त केले. तपासातील त्रुटी आणि अटकेच्या कायदेशीर प्रक्रियेतील त्रुटींमुळे न्यायालयाने आरोपीस जामिनावर मुक्त करण्याचा आदेश दिला. अनिल लक्ष्मण गायकवाड असे आरोपीचे नाव आहे.

१३ मे रोजी पीडितेने पारनेर पोलीस ठाण्यात आरोपी अनिल गायकवाड याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला होता. फिर्यादीनुसार, आरोपीने प्रेमाच्या जाळ्यात ओढून विश्वास संपादन केला. त्यानंतर घरात बळजबरीने प्रवेश करून बेडरूममध्ये नेले आणि इच्छेविरुद्ध वारंवार शरीरसंबंध ठेवले. तसेच कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली व घराबाहेर ज्वलनशील पदार्थ टाकून घर पेटवून देण्याचा प्रयत्न केला, असे गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आले होते. या तक्रारीनंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक करून पारनेर न्यायालयात हजर केले होते.आरोपी अनिल गायकवाड यांच्या वतीने ॲड. महेश तवले, ॲड. संजय दुर्शिंग आणि ॲड. देवांशू धोकरिया यांनी न्यायालयात बाजू मांडली.

बचाव पक्षाच्या वकिलांनी पोलिसांच्या तपासातील मोठ्या तफावती आणि तांत्रिक त्रुटी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. तसेच पीडितेकडून आपल्या पदाचा गैरवापर करून आरोपीकडून मोठी खंडणी उकळण्याच्या उद्देशाने बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल केल्याचे सांगितले.

बचाव पक्षाच्या वकिलांचा हा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला. आणि आरोपी अनिल गायकवाड याची त्वरित मुक्तता करण्याचे आदेश पारित केले.

# अर्थजगत



गुंतवणुकीच्या जगात यशस्वी होण्यासाठी केवळ अफाट बुद्धिमत्ता किंवा प्रचंड भांडवलच आवश्यक असते असे नाही, तर संयम आणि शिस्त अधिक महत्त्वाची ठरते. हे सिद्ध करण्यासाठी वॉरन बफे आणि रोनाल्ड रीड या दोन टोकाच्या व्यक्तिमत्त्वांची उदाहरणे नेहमीच दिली जातात. या दोघांच्या गुंतवणूक शैलीतील फरक सामान्य गुंतवणूकदारांसाठी संपत्ती निर्मितीचा एक मोठा वस्तुपाठ आहे.जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेले वॉरन बफे हे 'व्हॅल्यू इन्वेस्टिंग'चे पुरस्कर्ते मानले जातात.

## वॉरेन बफे की रोनाल्ड रीड?

■ गुंतवणूक

कंपन्यांचे व्यवस्थापन उत्तम आहे आणि ज्यांच्या व्यवसायात दीर्घकालीन वाढीची क्षमता आहे, अशा कंपन्यांचे शेअर्स योग्य किमतीत खरेदी करून ते अनेक दशके आपल्याकडे ठेवण्यावर त्यांचा भर असतो. बफे यांची रणनीती ही सखोल अभ्यास, व्यवसायाची समज आणि चक्रवाढ व्याजाच्या (कंपाउंडिंग) ताकदीवर आधारित आहे. मात्र, ही शैली आत्मसात करण्यासाठी बाजाराचे तांत्रिक ज्ञान आणि संयम असणे आवश्यक आहे.

दुसरीकडे, रोनाल्ड रीड यांची कथा थक्क करणारी आहे. रीड हे कोणतेही मोठे गुंतवणूक तज्ज्ञ नव्हते; त्यांनी गॅस स्टेशनवर अटेंडंट आणि सफाई कामगार म्हणून काम केले. मात्र, त्यांच्या निधनानंतर त्यांच्याकडे ८ दशलक्ष डॉलर्सची मोठी संपत्ती असल्याचे समोर आले. रीड यांनी केवळ साधी आणि सरळ रणनीती अवलंबली होती. मिळालेल्या उत्पन्नातील काही हिस्सा वाचवणे, तो चांगल्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणे आणि त्या गुंतवणुकीला दशकानुदशके हात न लावणे. लाभांशाचा (डिव्हिडंड) पुन्हा गुंतवणुकीसाठी वापर करणे हे त्यांच्या यशाचे गमक होते.

या दोन शैलींची तुलना केल्यास असे दिसून येते की, सामान्य गुंतवणूकदारासाठी रोनाल्ड रीड यांचा मार्ग अधिक सुलभ आणि अनुकरणीय आहे. प्रत्येकालाच वॉरन बफे यांच्यासारखे बाजाराचे विश्लेषण करणे शक्य नसते, परंतु रीड यांच्यासारखी शिस्त आणि बचत कोणीही पाळू शकते. संपत्ती कमवण्यासाठी तुम्ही किती कमावता यापेक्षा तुम्ही किती वाचवता आणि किती काळ गुंतवणूक टिकवून ठेवता, हे अधिक निर्णायक ठरते.

अखेर, गुंतवणूकदाराने आपल्या कौशल्यानुसार मार्ग निवडावा. जर तुम्हाला व्यवसायाची समज असेल तर बफे यांची शैली निवडावी, अन्यथा रोनाल्ड रीड यांच्याप्रमाणे संथ पण खात्रीशीर मार्गाने संपत्ती निर्मितीकडे वाटचाल करावी. बाजारातील चढ-उतारांकडे दुर्लक्ष करून दीर्घकाळ टिकून राहणे, हाच या दोन्ही शैलींमधील समान आणि सर्वात महत्त्वाचा धागा आहे.

◆◆◆

विमा क्षेत्रात डिजिटल क्रांती झाल्यामुळे आज घरबसल्या पॉलिसी काढणे सोपे झाले असले, तरी या सुविधेसोबतच ग्राहकांच्या फसवणुकीचे नवे मार्गही कंपन्यांनी शोधून काढले आहेत. सध्या विमा कंपन्यांच्या संकेतस्थळांवर आणि ॲप्सवर 'डार्क पॅटर्न्स'चा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. हा प्रकार म्हणजे ग्राहकांना फसवून किंवा त्यांच्या मानसिकतेचा फायदा घेऊन त्यांच्याकडून अधिक पैसे उकळण्यासाठी केलेली एक तांत्रिक मांडणी आहे. ग्राहक जेव्हा घाईत किंवा अजाणतेपणी ऑनलाईन विमा खरेदी करतो, तेव्हा या जाळ्यात सहज अडकतो.

## विमा क्षेत्रातील 'डार्क पॅटर्न्स'




■ विमाजगत


या प्रक्रियेतील सर्वात सामान्य प्रकार म्हणजे 'प्री-टिक्ड बॉक्सेस'. जेव्हा एखादा ग्राहक जीवन विमा किंवा वाहन विमा खरेदी करतो, तेव्हा कंपनीकडून आधीच काही अतिरिक्त कव्हर (ॲड-ऑन्स) निवडलेले असतात. उदाहरणार्थ, वाहन विम्यामध्ये 'रोडसाईड असिस्टन्स' किंवा 'इंजिन प्रोटेक्शन' यांसारखे पर्याय आधीच 'टिक' केलेले असतात. ग्राहकाचे याकडे लक्ष न गेल्यास त्याला या अनावश्यक सेवांसाठी विनाकारण जास्तीचा हप्ता भरावा लागतो. अनेकदा हे पर्याय रद्द करण्याची प्रक्रिया इतकी गुंतागुंतीची ठेवली जाते की, ग्राहक कंटाळून ते तसेच राहू देतो. दुसरा महत्त्वाचा प्रकार म्हणजे 'किमतीचा संभ्रम' आणि 'अदृश्य शुल्क'. सुरुवातीला जाहिरातीमध्ये विम्याचा हप्ता अत्यंत कमी दाखवला जातो. मात्र, जेव्हा ग्राहक सर्व माहिती भरून शेवटच्या टप्प्यावर पोहोचतो, तेव्हा त्यात प्रक्रिया शुल्क, सोयीचे शुल्क किंवा इतर प्रशासकीय खर्च जोडून ती रक्कम वाढवली जाते. ग्राहकाला वाटते की आपण आता सर्व माहिती भरली आहे, तर पुन्हा दुसरीकडे कशाला शोधायचे, आणि याच मानसिकतेचा फायदा कंपन्या घेतात. यालाच तांत्रिक भाषेत 'बास्केट स्नेकिंग' असेही म्हटले जाते, जिथे ग्राहकाच्या संमतीशिवाय त्याच्या बिलात काही घटक चोरून टाकले जातात. तसेच, ग्राहकांवर दबाव निर्माण करण्यासाठी 'फॉल्स अर्जन्सी'चा वापर केला जातो. ही सवलत फक्त पुढील १० मिनिटांसाठी आहे किंवा आत्ताच ५ लोकांनी ही पॉलिसी खरेदी केली आहे अशा प्रकारचे संदेश दाखवून ग्राहकाला विचार करण्यास वेळच दिला जात नाही. दबावाखाली घेतलेले विम्याचे निर्णय अनेकदा चुकीचे ठरतात. याशिवाय, विमा कंपन्या ग्राहकांकडून केवळ माहिती घेण्यासाठी भ्रमणध्वनी क्रमांक घेतात आणि त्यानंतर त्यांची संमती आहे असे भासवून सतत कॉल्स आणि संदेशांचा भडिमार सुरू करतात.

◆◆◆

**ग्राहकांनी या डिजिटल जाळ्यातून वाचण्यासाठी अत्यंत सावध राहणे गरजेचे आहे. कोणताही विमा खरेदी करताना प्रत्येक पर्यायाची नीट तपासणी करणे, अटी व शर्तींचे बारकाईने वाचन करणे आणि घाईघाईत पेमेंट न करणे हेच हिताचे ठरते. विमा ही भविष्यातील सुरक्षा आहे, त्यामुळे ती घेताना पारदर्शकता असणे हा ग्राहकाचा अधिकार आहे. कंपन्यांच्या या दिशाभूल करणाऱ्या पद्धतींवर आता नियामक मंडळाचीही करडी नजर असली, तरी वैयक्तिक जागरूकता हाच मोठा उपाय आहे.**

## केवळ चांगला सिबील स्कोअर पुरेसा नाही

■ बँकिंग





कर्ज मिळवण्यासाठी केवळ चांगला 'सिबिल स्कोअर' असणे पुरेसे आहे, हा सर्वसामान्यांचा समज आता कालबाह्य ठरत आहे. बँका आणि वित्तीय संस्था आता कर्ज मंजूर करण्यापूर्वी सिबिल स्कोअर पलीकडे जाऊन अनेक तांत्रिक आणि आर्थिक बाबींची सखोल तपासणी करत आहेत. कर्जाचा अर्ज मंजूर करताना बँका प्रामुख्याने संबंधित व्यक्तीची उत्पन्न क्षमता आणि सध्या सुरू असलेल्या इतर कर्जांच्या हप्त्यांचा (ईएमआय) विचार करतात. तुमच्या उत्पन्नाच्या तुलनेत कर्जाचे प्रमाण किती आहे, याला बँकिंग परिभाषेत 'डेट-टू-इन्कम रेशो' म्हटले जाते आणि हा घटक कर्ज मंजुरीमध्ये निर्णायक भूमिका बजावतो.

एखाद्या व्यक्तीचा पतमानांकन निर्देशांक (क्रेडिट स्कोअर) ७५० पेक्षा जास्त असला तरी, जर त्याच्या मासिक उत्पन्नातील मोठा हिस्सा आधीच इतर कर्जांचे हप्ते भरण्यात जात असेल, तर बँका नवीन कर्ज देण्यास टाळाटाळ करतात. यासोबतच कर्जदाराच्या बँक खात्यातील पैशांचा ओघ म्हणजेच 'कॅश फ्लो' तपासला जातो. खात्यात दरमहा किती रक्कम जमा होते आणि किती शिल्लक राहते, यावरून कर्जदाराची परतफेड करण्याची क्षमता जोखली जाते. जर खात्यात सातत्याने किमान शिल्लक राहत नसेल किंवा धनादेश अनादर (चेक बाऊन्स) झाल्याच्या नोंदी असतील, तर उत्तम सिबिल स्कोअर असूनही कर्ज नाकारले जाऊ शकते.

कर्ज घेण्याच्या पद्धतीवरही बँकांचे बारीक लक्ष असते. वारंवार वैयक्तिक कर्ज (पर्सनल लोन) किंवा असुरक्षित कर्ज घेण्याची प्रवृत्ती नकारात्मक मानली जाते. तसेच, क्रेडिट कार्डाची मर्यादा पूर्णपणे वापरणे किंवा केवळ किमान देय रक्कम (मिनिमम ड्यू) भरण्याची सवय ही आर्थिक ओढाताण दर्शवते. बँका अशा ग्राहकांना 'जोखीमयुक्त' श्रेणीत टाकतात. याव्यतिरिक्त, कर्जदाराचे वय, नोकरी किंवा व्यवसायाचे स्वरूप आणि त्यातील स्थिरता या गोष्टीही महत्त्वाच्या ठरतात. थोडक्यात सांगायचे तर, कर्ज मिळवण्यासाठी केवळ अंकातील स्कोअर महत्त्वाचा नसून, संपूर्ण आर्थिक शिस्त आणि परतफेडीचे सातत्य तपासले जाते. कर्जदाराने आपल्या उत्पन्नाच्या ३० ते ४० टक्क्यांपेक्षा जास्त हिस्सा हप्त्यांमध्ये गुंतवू नये, असा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जातो. आपल्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता ठेवणे आणि गरजेपुरतेच कर्ज घेणे, हाच कर्ज मंजुरीचा सर्वात सोपा आणि सुरक्षित मार्ग ठरतो. बँकांच्या या बदलत्या नियमांमुळे आता ग्राहकांना आपला आर्थिक पोर्टफोलिओ अधिक सक्षम करण्यावाचून पर्याय उरलेला नाही.

◆◆◆




## मासिक खर्चासाठी निश्चित रक्कम हवीय?

■ टॅक्स झोन

गुंतवणुकीच्या विश्वात सध्या म्युच्युअल फंड आणि 'एसआयपी'ची कमालीची चर्चा असली, तरी नियमित उत्पन्नासाठी केवळ याच पर्यायांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. बाजारातील चढ-उतारांपासून दूर राहून खात्रीशीर परतावा देणारे अनेक पारंपरिक आणि आधुनिक पर्याय गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध आहेत. विशेषतः निवृत्तीनंतर किंवा मासिक खर्चासाठी निश्चित रकमेची गरज असलेल्या व्यक्तींसाठी सात महत्त्वाचे मार्ग मार्गदर्शक ठरू शकतात.

वरिष्ठ नागरिक बचत योजना (एससीएसएस) हा ज्येष्ठ नागरिकांसाठी अत्यंत सुरक्षित आणि फायदेशीर पर्याय आहे. यामध्ये गुंतवणुकीवर मिळणारे व्याज तिमाही स्वरूपात मिळते, जे नियमित गरजा पूर्ण करण्यासाठी उपयुक्त ठरते. तसेच, पोस्टाची मासिक उत्पन्न योजना (एमआयएस) मध्यमवर्गीयांमध्ये लोकप्रिय आहे. यात एकरकमी गुंतवणूक केल्यानंतर दरमहा ठराविक व्याज थेट खात्यात जमा होते, ज्यामुळे आर्थिक शिस्त लागते.

सरकारी रोखे (जी-सेक) आणि कॉर्पोरेट बॉण्ड्स हे देखील स्थिर उत्पन्नाचे उत्तम स्रोत मानले जातात. पूर्वी हे पर्याय केवळ मोठ्या संस्थांसाठी खुले होते, परंतु आता सर्वसामान्य नागरिकही यामध्ये सहज गुंतवणूक करू शकतात. याशिवाय, रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (रीट्स) हा एक आधुनिक पर्याय आहे. ज्यांना प्रत्यक्ष मालमत्ता खरेदी करणे शक्य नाही, ते 'रीट्स'च्या माध्यमातून व्यावसायिक रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करून लाभांशाच्या स्वरूपात नियमित उत्पन्न मिळवू शकतात.

शेअर बाजारात दीर्घकालीन गुंतवणूक करणाऱ्यांसाठी 'डिव्हिडंड पेईंग स्टॉक्स' म्हणजे लाभांश देणारे शेअर्स हा एक उत्पन्नाचा स्रोत असू शकतो. मोठ्या आणि स्थिर कंपन्या आपल्या नफ्यातील काही हिस्सा भागधारकांना देतात. त्याचप्रमाणे, प्रधानमंत्री वय वंदना योजनेसारख्या पेन्शन योजनाही सुरक्षितता आणि परतावा यांचा उत्तम मेळ घालतात.

अखेरचा पर्याय म्हणजे बँकेतील मुदत ठेव (एफडी). जरी सध्या व्याजाचे दर अस्थिर असले, तरी मासिक किंवा त्रैमासिक व्याज घेण्याचा पर्याय निवडून सुरक्षित उत्पन्न मिळवता येते. आपल्या आर्थिक उद्दिष्टांनुसार आणि जोखीम घेण्याच्या क्षमतेनुसार या विविध पर्यायांची योग्य सांगड घालणे आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यात आर्थिक स्वावलंबन टिकून राहील.

◆◆◆

## 'एसटीटी'मधील वाढीचा फटका



■ जाणून घ्या

भारतीय भांडवली बाजारात एप्रिल महिन्यात व्यापार उपक्रमांचे एक वेगळेच चित्र पाहायला मिळाले. एकीकडे इक्विटी बाजारातील जबरदस्त तेजीमुळे रोख (कॅश) विभागातील उलाढाल ७ टक्क्यांनी वधारली असताना, दुसरीकडे सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) मधील वाढ आणि कडक नियमांमुळे डेरिव्हेटिव्ह ट्रेडिंगच्या उलाढालीत ६ टक्क्यांनी घट झाली आहे. १ एप्रिलपासून लागू झालेल्या नवीन नियमांनुसार, वायदा बाजारातील (फ्युचर्स) कर ०.०२ टक्क्यांवरून ०.०५ टक्के, तर ऑप्शन्सवरील कर ०.१ टक्क्यांवरून ०.१५ टक्के करण्यात आला आहे, ज्याचा थेट परिणाम व्यापाराच्या प्रमाणावर झाला आहे.

रोख बाजारातील सरासरी दैनंदिन उलाढाल (एडीटीवी) १.४४ लाख कोटी रुपयांवर पोहोचली असून, हा गेल्या दोन वर्षांतील उच्चांक आहे. मार्च महिन्यातील मोठ्या घसरणीनंतर एप्रिलमध्ये निफ्टी आणि सेन्सेक्समध्ये अनुक्रमे ७.५ टक्के आणि ६.९ टक्क्यांची दमदार सुधारणा दिसून आली. विशेषतः मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांनी अनुक्रमे १३.६ टक्के आणि १८.४ टक्क्यांची ऐतिहासिक झेप घेतली आहे. बाजारातील या सकारात्मक वातावरणामुळे अनेक गुंतवणूकदार पुन्हा एकदा रोख विभागाकडे आकर्षित झाले असून, ते आपली जुनी तूट भरून काढण्यासाठी किंवा नवीन सौदे करण्यासाठी सक्रिय झाले आहेत. मात्र, डेरिव्हेटिव्ह विभागातील चित्र चिंतेचे आहे. या विभागातील दैनंदिन उलाढाल ४८६ लाख कोटी रुपयांपर्यंत खाली आली असून, ही जानेवारी महिन्याच्या तुलनेत १८ टक्क्यांची घट आहे. कर वाढीचा सर्वाधिक फटका 'अल्गो ट्रेडर्स'ना बसला असून, ब्रोकर आणि ट्रेडर्ससाठी उपलब्ध असलेली रोख रक्कमही घटली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या भांडवली एक्सपोजर नियमांमुळे व्यवहारांची किंमत वाढली असून, व्यापाऱ्यांसाठीची तरलता कमी झाली आहे. या तांत्रिक बदलांमुळे आणि वाढलेल्या खर्चामुळे अनुभवी गुंतवणूकदारांनी डेरिव्हेटिव्ह ट्रेडिंगमध्ये सावध पवित्रा घेतला आहे.

एकीकडे एकूण उलाढाल घटत असताना, बीएसईने मात्र डेरिव्हेटिव्ह विभागात आपली पकड मजबूत केली आहे. प्रथमच बीएसईचा नोशनल मार्केट शेअर ५० टक्क्यांच्या पुढे गेला असून, त्याचे दैनंदिन सरासरी व्यवहार २६९ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहेत, जे एनएसईच्या २१७ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहेत. साप्ताहिक एक्स्पायरीच्या नियमावलीत झालेले बदल आणि बाजारातील चढ-उतार यामुळे व्यापारी आता बीएसई आणि एमसीएक्सकडे वळत असल्याचे दिसून येत आहे.

दुसरीकडे, नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या सक्रिय ग्राहक संख्येत ३५ लाखांची मोठी घट होऊन ती ४.५२ कोटींवर आली आहे. हे प्रामुख्याने लहान ट्रेडर्सनी बाजारापासून घेतलेल्या दुराव्याचे निदर्शक आहे. बाजार नियामक सेबीने डेरिव्हेटिव्ह व्यापाराबाबतचे नियम कडक केल्याने, विशेषतः साप्ताहिक एक्स्पायरी केवळ दोन दिवसांपुरती मर्यादित केल्याने, सौद्यांच्या संख्येत मोठी घसरण झाली आहे. वाढता कर आणि कठोर नियमांमुळे आता किरकोळ गुंतवणूकदार आणि छोटे व्यापारी जोखीम घेण्याऐवजी संयमी धोरण स्वीकारत असल्याचे स्पष्ट होत आहे.

◆◆◆



## सहा वर्षांत निफ्टी ५० हजारापर्यंत?

■ बाजारवेध


मोतीलाल ओसवाल फायनान्शिअल सर्व्हिसेसचे अध्यक्ष रामदेव अग्रवाल यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या उज्ज्वल भविष्याबद्दल मोठा विश्वास व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, सध्या जागतिक स्तरावर अनिश्चिततेचे वातावरण असले तरी, भारतीय शेअर बाजारात 'डर के आगे जीत है' अशी स्थिती आहे. आगामी १० वर्षांत भारताची अर्थव्यवस्था १० लाख कोटी डॉलर्सवर पोहोचण्याचा अंदाज असून, २०३२ पर्यंत निफ्टी ५०,००० अंकांच्या ऐतिहासिक पातळीला स्पर्श करू शकतो, असा दावा त्यांनी केला आहे.

रामदेव अग्रवाल यांनी स्पष्ट केले की, पश्चिम आशियातील युद्ध आणि होर्मुज सामुद्रधुनीमधील अडथळ्यांमुळे कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. ब्रेंट क्रूडचे दर १२० ते १३० डॉलर्स प्रति बॅरलच्या वर राहिल्यास केवळ चालू तिमाहीतच नव्हे, तर संपूर्ण आर्थिक वर्ष २०२७ मध्ये मोठी आव्हाने उभी राहू शकतात. याचा थेट परिणाम उपभोग (कंझम्प्शन) क्षेत्रावर होईल आणि ऑटो तसेच एफएमसीजी कंपन्यांना वाढीव खर्चाचा बोजा ग्राहकांवर टाकावा लागेल. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे पेट्रोल-डिझेलचे दर वाढण्याची शक्यता असून, त्याचा अर्थव्यवस्थेच्या गतीवर परिणाम होऊ शकतो.

■ **आयटी आणि एफएमसीजी क्षेत्रातील बदल :** आयटी क्षेत्राचे पारंपरिक बिझनेस मॉडेल आता बदलत असून, केवळ मनुष्यबळ वाढवून प्रगती साधणे आता शक्य नाही. हे क्षेत्र आता मोठ्या स्थित्यंतरातून जात आहे. कच्च्या मालाच्या किमती वाढल्यामुळे एफएमसीजी कंपन्यांच्या नफ्यावर दबाव आहे. आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत या क्षेत्राचे निकाल कमकुवत राहण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे. तथापि, देशातील राजकीय घडामोडींचे अग्रवाल यांनी स्वागत केले आहे. त्यांच्या मते, पाच राज्यांच्या निकालांनंतर आर्थिक सुधारणांना (रिफॉर्म्स) मोठी गती मिळेल. विशेषतः पूर्व भारतात मोठे बदल पाहायला मिळतील, ज्यामुळे एकूण आर्थिक क्रियाकलाप वेगवान होतील. हे लक्षात घेता बाजारातील सध्याच्या घसरणीला घाबरून न जाता, ती एक मोठी संधी मानली पाहिजे, असा सल्ला अग्रवाल यांनी दिला आहे. दर्जेदार कंपन्या सध्या स्वस्त व्हॅल्युएशनवर उपलब्ध आहेत. विशेषतः फायनान्शिअल आणि कॅपिटल मार्केटशी संबंधित शेअर्समध्ये गुंतवणुकीची उत्तम संधी आहे. भारतातील डीमॅट खात्यांची संख्या सध्या २२.५ कोटी असून, पुढील ७-८ वर्षांत ती ५० कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे भांडवली बाजाराशी संबंधित उद्योगांची वाढ निश्चित आहे. रामदेव अग्रवाल यांनी आपल्या कंपनीच्या कामगिरीबद्दलही माहिती दिली. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कंपनीचा ऑपरेटिंग नफा २५०० कोटी रुपयांवर पोहोचला असून, गेल्या १० वर्षांत नफ्याची सरासरी वाढ ३३ टक्के राहिली आहे. हाऊसवेल्थ, वेल्थ मॅनेजमेंट आणि एएमसी व्यवसायात मजबूत वाढ दिसून येत असून, आगामी काळात कंपनी बेंगळुरू आणि अहमदाबादसारख्या मोठ्या शहरांमध्ये विस्तार करण्यावर भर देणार आहे.

◆◆◆

## संरक्षण क्षेत्रातील समभागांत गुंतवणूक करावी का?



■ अर्थ-धोरण

केंद्र सरकारच्या 'मेक इन इंडिया' अभियानामुळे भारतीय संरक्षण क्षेत्रात मोठे परिवर्तन घडून येत आहे. या पार्श्वभूमीवर, 'डॅम कॅपिटल' या प्रसिद्ध ब्रोकरेज फर्मने संरक्षण क्षेत्रातील समभागांवर सकारात्मक अहवाल प्रसिद्ध केला असून, आगामी अनेक दशकांसाठी या क्षेत्रात मोठी वाढ अपेक्षित असल्याचे म्हटले आहे. कधीकाळी पूर्णपणे आयातीवर अवलंबून असलेले हे क्षेत्र आता स्वावलंबी झाले असून वेगाने निर्यातीकडे वळत आहे.

ब्रोकरेजच्या विश्लेषणानुसार, येत्या पाच वर्षांत संरक्षण क्षेत्रात सुमारे १५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होणार आहेत. वाढता जागतिक भू-राजकीय तणाव पाहता या क्षेत्रातील दीर्घकालीन वाढीला अधिक वेग मिळण्याची शक्यता आहे. सरकारने आर्थिक वर्ष २०२९ पर्यंत देशांतर्गत संरक्षण उत्पादन ३ लाख कोटी रुपयांवर आणि संरक्षण निर्यात ५०,००० कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे.

● **निर्यात आणि बड्या कंपन्यांचे वर्चस्व :** आगामी काळात हिंदुस्थान एरोनॉटिक्स, भारत इलेक्ट्रॉनिक्स, भारत डायनॅमिक्स, माझगाव डॉक आणि लार्सन अँड टुब्रो या पाच प्रमुख कंपन्या मिळून पुढील पाच वर्षांत १.७२ लाख कोटी रुपयांहून अधिक किमतीची निर्यात करू शकतात. संरक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये भारताची संरक्षण निर्यात १,३८,४२४ कोटी रुपयांवर पोहोचली आहे, जी या क्षेत्रातील प्रगतीचा मोठा पुरावा आहे.

● **प्रमुख समभाग आणि उद्दिष्ट किंमत :** डॅम कॅपिटलने आपल्या पसंतीच्या नऊ समभागांची यादी जाहीर केली आहे, त्यातील प्रमुख समभाग खालीलप्रमाणे आहेत:

- **हिंदुस्थान एरोनॉटिक्स : ६,३०० रुपये**
- **भारत इलेक्ट्रॉनिक्स : ५३० रुपये**
- **भारत डायनॅमिक्स : १,५४० रुपये**
- **एस्ट्रा मायक्रोवेव्ह प्रॉडक्ट्स:१,३०० रुपये**
- **सोलर इंडस्ट्रीज:१७,०६० रुपये**
- **झेन टेक्नॉलॉजीज:१,९९० रुपये**
- **मिश्र धातू निगम: ४३० रुपये**

दुसरीकडे, गार्डन रीच शिपबिल्डर्स (लक्ष्य: २,६६० रुपये) आणि माझगाव डॉक (लक्ष्य: २,७७० रुपये) या समभागांवर ब्रोकरेजने सध्या 'तटस्थ' रेटिंग दिले आहे. गार्डन रीचच्या समभागात सध्याच्या किमतीवरून सुमारे ९ टक्क्यांची घसरण होऊ शकते, असाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सरकारी धोरणे आणि वाढते संरक्षण बजेट पाहता या क्षेत्रातील स्केल आणि वृद्धी दोन्ही आगामी काळात वेगाने वाढताना दिसतील.

◆◆◆

# विधानपरिषदेच्या १६ जागांसाठी १८ जूनला मतदान

मुंबई / नगर – राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोट्यातील विधानपरिषदेच्या रखडलेल्या १६ जागांसाठी अखेर केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केली आहे. या जागांवर द्विवार्षिक निवडणूक घेण्याची घोषणा अधिकृत प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आली असून, यासाठी येत्या १८ जून रोजी मतदान पार पडणार आहे. ७५ टक्के मतदार उपलब्ध असण्याची तांत्रिक अट पूर्ण झाल्यामुळे अहिल्यानगरच्या रिक्त जागेवरही निवडणूक घेण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघात निवडणूक घेण्यासाठी किमान ७५% स्थानिक संस्था कार्यरत असणे आणि ७५% मतदार पदावर असणे अनिवार्य असते. या अटींची पूर्तता न झाल्यामुळे २०२२, २०२४ आणि २०२५ मध्ये रिक्त झालेल्या जागांवर वेळेत निवडणूक घेता आली नव्हती. मात्र, आता हा निकष पूर्ण झाल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर निवडणूक आयोगाने हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम जाहीर केला आहे.

## तांत्रिक अडचण सुटल्याने नगरचा मार्गही मोकळा

अहिल्यानगरमध्ये ८२.४७% मतदार कार्यरत असल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाने निवडणूक विभागाला पाठविला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका वेळेत न झाल्यामुळे जिल्हा परिषदेचे ७५ सदस्य आणि पंचायत समितीचे १४ सभापती अशी एकूण ८९ पदे सध्या रिक्त आहेत. मात्र, असे असले तरी जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींमधील सदस्यांमुळे मतदानाचा टक्का निकषापेक्षा जास्त आहे. जिल्ह्यात एकूण ५६९ मतदारांपैकी ४६१ सदस्य (नगरसेवक) सद्यस्थितीत कार्यरत आहेत. जिल्ह्यातील एकूण १८ स्थानिक संस्थांमधील ५६९ जागांपैकी ४६१ मतदार सक्रिय आहेत आणि त्यांना मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. महानगरपालिकेचे ७३, नगरपालिकेचे ३१२, नगरपंचायतीचे ७६ असे एकूण ४६१ नगरसेवक कार्यरत आहेत. हे प्रमाण ८२.४७ टक्के असून, नियमानुसार ७५ टक्क्यांपेक्षा जास्त असल्याने अहिल्यानगरच्या जागेसाठी निवडणूक घेण्यातील मुख्य तांत्रिक अडचण दूर झाली आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकांनंतर जिल्हा प्रशासनाने हा अधिकृत अहवाल राज्य निवडणूक आयोगाला सादर केला आहे. केंद्रीय व राज्य निवडणूक आयोगाच्या अंतिम मंजुरीनंतर राज्यातील इतर जागांसोबतच अहिल्यानगरचीही निवडणूक आता जाहीर झाली असून राजकीय हालचालींना वेग आला आहे.

### असे आहे निवडणुकीचे संपूर्ण वेळापत्रक

- अधिकृत अधिसूचना जारी होणार : २५ मे २०२६
- अर्ज भरण्याची शेवटची तारीख: ०१ जून २०२६
- उमेदवारी अर्जांची छाननी : ०२ जून २०२६
- अर्ज मागे घेण्याची मुदत : ०४ जून २०२६
- मतदान:१८ जून २०२६ (सकाळी ८ ते दुपारी ४)
- मतमोजणी व निकाल : २२ जून २०२६

# वाघेश्वरी मंदिरात चोरी, दागिने लंपास


नगर – नगर तालुक्यातील पारगाव भातोडी येथील येथील वाघेश्वरी मंदिरात अज्ञात चोरट्यांनी मोठी चोरी केली आहे. मंदिरातील मूर्तीवरील सोन्याचांदीचे दागिने व सीसीटीव्ही चा डीव्हीआर असा सुमारे १ लाख २२ हजार ५०० रुपये किंमतीचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

याबाबत प्रदीप अर्जुन शिंदे (वय ४७, रा. पारगाव भातोडी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. अज्ञात चोरट्यांनी १६ मे रोजी रात्री ९.३० ते १७ मे रोजी पहाटे ५.३० यावेळेत वाघेश्वरी मंदिरात दरवाजाचे कुलूप तोडून प्रवेश करत गाभाऱ्यातील देवी मूर्ती चे चांदीचे दोन मुकुट, चांदीचे त्रिशूल, चांदीचे दोन करांडे तसेच सोन्याचे दागिने, पितळी पादुका असा सुमारे १ लाख २२ हजार ५०० रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. या शिवाय चोरट्यांनी मंदिरात बसवलेल्या सीसीटीव्ही चा डिव्हीआर ही घेवून गेले.

१७ मे रोजी सकाळी मंदिर उघडल्यानंतर ही घटना निदर्शनास आली. चोरीची माहिती समजताच ग्रामस्थांनी मंदिर परिसरात मोठी गर्दी केली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

# देशातील सर्वात मोठ्या संरक्षण कारखान्याचे अहिल्यानगरमध्ये २३ मे रोजी होणार उद्घाटन

## १५५ मिलीमीटर क्षमतेच्या ५ लाख तोफगोळ्याचे प्रतिवर्षी उत्पादन






शिर्डी – येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत खासगी क्षेत्रातील देशातील सर्वात मोठ्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन येत्या २३ मे रोजी केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते होणार आहे. या प्रकल्पात १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफगोळ्यांचे उत्पादन होणार असून, प्रतिवर्षी ५ लाख तोफगोळे तयार करण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व ग्लोब फोर्ज लिमिटेडचे संचालक तथा चेअरमन रविकांत यांनी आज येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भूषविणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया आणि मेक फॉर द वर्ल्ड या संकल्पनांना बळ देणारा हा प्रकल्प अवघ्या एका वर्षात उभारण्यात आला आहे. या कारखान्यात १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफगोळ्यांचे उत्पादन केले जाईल. प्रतिवर्षी ५ लाख तोफगोळे तयार करण्याची या कारखान्याची क्षमता असून, खाजगी क्षेत्रातील तोफगोळा उत्पादनाची ही देशातील सर्वांत मोठी क्षमता मानली जात आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पाचे संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान आणि कच्चा माल पूर्णपणे स्वदेशी आहे. शिर्डी येथील कारखाना सुमारे २०० एकर क्षेत्रावर विकसित होत आहे. या प्रकल्पात रॉकेट लाँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन आणि विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा उभारल्या जात आहेत. यासाठी १ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून, त्यापैकी ६०० कोटींची गुंतवणूक पूर्ण झाली आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन संरक्षणमंत्री करणार असून, याच दिवशी प्रतिदिन १५ टन क्षमतेच्या बायो–सीएनजी प्रकल्पाचेही लोकार्पण केले जाणार आहे, अशी माहिती मंत्री विखे पाटील यांनी दिली.

ऐतिहासिक उद्घाटनाचे औचित्य साधून २३ आणि २४ मे रोजी शिर्डीत एका विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या आणि १०० हून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग सहभागी होणार आहेत. जिल्हाभरातील नागरिक आणि तरुणांनी या प्रदर्शनाला भेट देऊन संरक्षण क्षेत्रातील रोजगाराच्या व उद्योगाच्या संधी जाणून घ्याव्यात, असे आवाहन पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले आहे.


### बेलवंडीत २ हजार कोटींची गुंतवणूक

शिर्डीतील दारुगोळी कारखान्यासोबतच श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथेही दारुगोळा निर्मिती संकुल उभारण्यात येत आहे. बेलवंडी येथे या प्रकल्पासाठी राज्य शासनाने सुमारे ६०० एकर जागा दिली आहे. या प्रकल्पात टीएनटी, आरडीएक्स, एचएमएक्ससारखी स्फोटके तयार केली जातील. यासाठी २ हजार कोटींची अतिरिक्त गुंतवणूक प्रस्तावित असून, दरवर्षी २० हजार टन टीएनटी उत्पादनाची देशातील सर्वात मोठी क्षमता येथे निर्माण होईल. शिर्डीत तयार होणाऱ्या तोफगोळ्यांमध्ये स्फोटके भरण्याचे महत्त्वाचे काम याच कारखान्यात केले जाणार आहे.

### ५ हजार तरुणांना मिळणार रोजगार

सर्व प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर जिल्ह्यातील सुमारे ४ ते ५ हजार तरुणांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. स्थानिक युवकांना सक्षम करण्यासाठी रतन टाटा ट्रस्टच्या सहकार्याने २०० कोटी रुपये आणि एमआयडीसीच्या ५० कोटींच्या निधीतून विशेष इनोव्हेशन सेंटर सुरू करण्यात येत आहे. तसेच राहाता येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे स्थलांतर एमआयडीसी परिसरात करण्यात आले आहे. भविष्यातील विस्तारासाठी सुपे परिसरात संरक्षण विभागाच्या जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया प्राथमिक स्तरावर सुरू असल्याचेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

# लालटाकी चौकातील नेहरूंचा पुतळा हटवून तेथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाचनालय उभारावे



नगर – मनमाड महामार्गावरून शहरात प्रवेश करताना लागणाऱ्या लालटाकी चौकातील देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा पुतळा हटविण्यात यावा. नेहरुंच्या विचारांची देशाला आणि आजच्या तरुणांना गरज नाही. त्यामुळे नेहरूंचा पुतळा हटवून त्या जागेवर साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने जिल्ह्यातील सर्वात मोठे वाचनालय उभारण्यात यावे, तसेच तरुणांना दिशा देण्यासाठी महापुरुषांचे वास्तुशिल्प उभारावे, अशी मागणी महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे करण्यात आली आहे.



दिनेश जोशी

सारसनगर (अहिल्यानगर) येथील रहिवासी दिनेश रमेश जोशी यांनी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्तांना यासंदर्भात लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, लालटाकी चौकातील महापालिकेच्या मोठ्या भूभागावर पंडित जवाहरलाल नेहरू यांचा पुतळा उभारलेला आहे. या ठिकाणी पूर्वी एक सुंदर धबधबा, गुलाबांची बाग आणि लहान मुलांना खेळण्यासाठी उद्यान (गार्डन) बनविण्यात आले होते. मात्र, सद्यस्थितीत या जागेची अत्यंत दुरावस्था झाली असून, तिथे कोणाला उभे राहणेही कठीण झाले आहे.

मनमाड महामार्गावरुन शहरात प्रवेश केल्यानंतर लालटाकी चौक हा पहिला मोठा मुख्य चौक लागतो. या ठिकाणी नगर शहराच्या वैभवात भर टाकणारा प्रकल्प उभारण्यात यावा. नेहरूंचा पुतळा काढून त्या ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाचे भव्य वाचनालय सुरू करावे, त्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेले साहित्य तरुणांना वाचण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच, या वाचनालयाच्या आतील भिंतींवर आद्यगुरू क्रांतिकारक लहुजी वस्ताद साळवे यांच्या जीवनावर आधारित आणि स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानाची माहिती देणारे वास्तुशिल्प तयार करावे, जेणेकरून आजच्या भरकटत चाललेल्या तरुण पिढीला त्यांच्या विचारांतून योग्य दिशा मिळू शकेल. अर्जदार दिनेश जोशी यांनी निवेदनाच्या शेवटी एक टिप्पणी जोडली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, पंडित नेहरू यांचे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबतचे लेखन आणि स्वातंत्र्यानंतर चीनने भारताची जमीन बळकावल्यानंतर नेहरू यांनी केलेले विधान पाहिले, तर त्यांच्या पुतळ्याचीच नव्हे, तर विचारांचीही गरज भारतातील तरुणांना नाही हे स्पष्ट होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीबाबत विद्यमान मालक यांनी आमचे आशिलाबरोबर सौदा केलेला आहे. विद्यमान मालकांचे असे म्हणणे की, सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बॅंक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, कोर्ट मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही वाद चालू असल्यास संबंधीतांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजिष्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे प्रमाणित नकलांसह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकत वर्णन** :– जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी ता.नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे माळीवाडा येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| स. नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
| --- | --- | --- |
| ६२/१अ/२ | २ | २५२–७० चौ.मी. |

हा संपुर्ण खुला प्लॉट.

यांसी चतु:सिमा :–
पुर्वेस – सनं. ६२/१अ/२ पैकी, दक्षिणेस – स.नं.६२/१,
पश्चिमेस – ९ मीटर रुंदीचा रस्ता,
उत्तरेस – प्लॉट नं.१
सदर मिळकतीचे विद्यमान मालक –
**श्री. विजयकुमार चंपालाल मुथा,**
रा. पुनममोतीनगर, अहिल्यानगर.

**ॲड. राजेंद्र पी. शेलोत**
'अर्हम', प्लॉट नं.२६,
आदिनाथ कॉलनी,
राऊत मळा, अहमदनगर.
मो.नं. ९४२२२२३४४१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीबाबत विद्यमान मालक यांनी आमचे आशिलाबरोबर सौदा केलेला आहे. विद्यमान मालकांचे असे म्हणणे की, सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बॅंक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, कोर्ट मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही वाद चालू असल्यास संबंधीतांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजिष्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे प्रमाणित नकलांसह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकत वर्णन** :– जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी ता.नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे माळीवाडा येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| स. नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
| --- | --- | --- |
| ६२/१अ/२ | १ | २६५–५९ चौ.मी. |

हा संपुर्ण खुला प्लॉट.

यांसी चतु:सिमा :–
पुर्वेस – सनं. ६२/१अ/२ पैकी, दक्षिणेस – प्लॉट नं.२,
पश्चिमेस – ९ मीटर रुंदीचा रस्ता,
उत्तरेस – ६ मीटर रुंदीचा रस्ता.
सदर मिळकतीचे विद्यमान मालक –
**श्री. विजयकुमार चंपालाल मुथा,**
रा. पुनममोतीनगर, अहिल्यानगर.

**ॲड. राजेंद्र पी. शेलोत**
'अर्हम', प्लॉट नं.२६,
आदिनाथ कॉलनी,
राऊत मळा, अहमदनगर.
मो.नं. ९४२२२२३४४१


# पाणी वापर संस्थांमधील गैरप्रकाराविरोधात आमरण उपोषण सुरु

नगर – मुळा पाटबंधारे विभागांतर्गत असणाऱ्या सहकारी पाणी वापर संस्थांच्या गैरप्रकारात सुधारणा होत नसल्याने भारतीय जनसंसदचे नेवासा तालुकाध्यक्ष रामराव भदगले यांनी समाजसेवक अण्णा हजारे यांची राळेगण सिद्धीत भेट घेऊन गैरप्रकार व भ्रष्टाचार कथन करून उपोषण करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्यानुसार १८ मे पासून अहिल्यानगर येथील मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर भारतीय जनसंसद संघटनेच्या वतीने आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

मुळा पाटबंधारे अंतर्गत राहुरी, नेवासा, शेवगाव व पाथर्डी तालुक्यात सहकारी पाणी वापर संस्था आहेत. मात्र त्यातील अनेक संस्थांमध्ये गैरप्रकार व गैरव्यवहार आहेत. माहिती अधिकारात माहिती मागणी केली असता माहिती न देताच माहिती दिली असल्याचे खोटीच उत्तरे दिले जातात. संस्थांच्या गैरप्रकाराबाबत व विविध समस्यांबाबत वेळोवेळी संबंधितांना निवेदने देऊन व समक्ष भेटूनही संस्थांच्या संचालक मंडळात काही फरक पडलेला नाही. सभासदांना जाणीवपूर्वक अपमानास्पद वागणूक दिली जाते. पाणीपट्टी रोख न स्विकारता ती चेक द्वारेच स्विकारून त्याची पावती द्यावी, संचालक मंडळाच्या मासिक बैठका व वार्षिक सर्वसाधारण सभा प्रत्यक्ष घ्याव्यात, लेखापरीक्षण करून त्यातील दोष वेळीच दूर व्हावेत. यासह इतर मागण्यांबाबत वारंवार पाठपुरावा करुनही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे रामराव पाटील भदगले यांनी अण्णा हजारे यांच्याशी समक्ष चर्चा करताना सांगितले. मार्च अखेर पाणी वापर संस्थांनी केलेल्या कामांची माहिती मागितली असता ती देण्यास टाळाटाळ करत तालुका स्तरावरून घ्यावी, असे सांगण्यात आले. त्यामुळे पाणी वापर संस्थांची विशेष पथकाद्वारे चौकशी करण्यात यावी, मागणीही भारतीय जनसंसदच्यावतीने करण्यात आली. वरील मागण्यासाठी भारतीय जनसंसदचे राज्य निमंत्रक अशोक सब्बन, जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे, तालुकाध्यक्ष रामराव पाटील भदगले, उपाध्यक्ष कारभारी गरड, व इतर कार्यकर्ते १८ मे पासून आमरण उपोषणास बसले आहेत.



अहिल्यानगर येथील मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर भारतीय जनसंसद संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

### कागदोपत्री कारभार अन् कोट्यवधींचे गैरप्रकार?

कालवा अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर) यांना दिलेल्या निवेदनात भारतीय जनसंसद संघटनेने पाणी वापर संस्थांच्या कारभाराचे वाभाडे काढले आहेत. संघटनेने प्रशासनाचे लक्ष वेधताना गंभीर आरोप केले आहेत. बहुतांश पाणी वापर संस्था फक्त कागदावरच असून, त्यांच्या मासिक किंवा सर्वसाधारण सभा प्रत्यक्ष न घेता केवळ रेकॉर्ड अद्ययावत केले जाते. शेतकऱ्यांकडून पाणी मागणी अर्ज भरून घेतले जात नाहीत, तसेच रोख घेतलेल्या रकमेची कोणतीही पावती दिली जात नाही. शेतकऱ्यांकडून पाणीपट्टीचे अव्वाच्या सव्वा पैसे घेऊन गैरप्रकार केला जात आहे. शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी वसूल केली जाते. मात्र ती शासनाकडे भरली जात नसल्याने संस्था थकबाकीदार बनल्या आहेत.

तसेच मागणी करूनही या संस्थांचे कोणतेही ऑडिट अहवाल मिळत नाहीत. अनेक पाणी वापर संस्थांची कार्यालये स्थापनेपासून बंद असून, तिथे सध्या बेकायदेशीर अतिक्रमणे व गैरप्रकार सुरू आहेत, असे आरोप भारतीय जनसंसद संघटनेच्यावतीने करण्यात आले आहेत.

# शेतकऱ्यांनी सरकारला कांदा विकू नये

नगर – शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला दर देण्याच्या नावाखाली सरकार आता कांदा खरेदी करून, कांद्याचे दर वाढल्या नंतर ते पाडण्यासाठी कांदा खरेदी करत आहे, म्हणून शेतकऱ्यांनी आता नाफेड किंवा एन सी सी एफ ला कांदा विकू नये असे आवाहन स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

केंद्र शासनाने दोन लाख टन कांदा खरेदी करण्याची घोषणा केली आहे. महाराष्ट्रात दोन लाख टन कांदा १२३५ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य दर मिळावा यासाठी ही खरेदी केली जाणार असल्याचा देखावा केला जात आहे मात्रपुढील महिन्यात कांद्याचे दर वाढणार असल्याचा अंदाज असल्यामुळे कांद्याचे दर नियंत्रित करण्यासाठी (पाडण्यासाठी) हा बफर स्टॉक करण्यात येणार आहे. महागाई आटोक्यात ठेवण्यासाठी हा बफर स्टॉक करायचा आहे असे शासनाच्या उद्देशात स्पष्ट म्हटलेले आहे.

शेतकऱ्यांना एक क्विंटल कांदा उत्पादित करण्यास किमान दोन हजार रुपये खर्च येतो, साठवणुकीसाठी पाच रुपये प्रति किलो खर्च होतो, त्याच्यावर काही नफा ठेऊन शासनाने खरेदी केली असती तर ते शेतकऱ्यांच्या हितासाठी झाले असते मात्र सरकार, निर्यात योग्य दर्जाचा कांदा फक्त १२३५ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करणार आहे. यात शेतकऱ्यांचा कोणताही फायदा नाही उलट जेव्हा दर वाढतील तेव्हा हाच कांदा पुन्हा बाजारात ओतून भाव पडणार आहे म्हणून शेतकऱ्यांनी सरकारला अजिबात कांदा विकू नये.

नाफेड व एनसीसीएफमार्फत होणाऱ्या या खरेदीत नेहमीचेच सोकावलेले बोके पुन्हा आपले उखळ पांढरे करून घेतील. शेतकऱ्यांकडून १२३५ रु. दराने उत्तम दर्जाचा कांदा खरेदी केला जातो. खुल्या बाजारात भाव वाढले की ही टोळी हा चांगला कांदा व्यापाऱ्यांना विकून टाकतात व त्या जागेवर कमी गुणवत्तेचा, आकाराचा, खराब कांदा सरकारला देतात. बऱ्याचदा कांदा प्रत्यक्ष खरेदी न करता फक्त कागदावर खरेदी दाखवतात व पैसे लाटतात. या घोटाळ्यात नाफेड, एनसीसीएफचे अधिकारी, काही पुढारी, व्यापारी, शासकीय अधिकारी व काही शेतकरी ही सामील असतात. यापूर्वीच स्वस्तात खरेदी केलेला कांदा व्यापारी शेतकऱ्यांच्या नावे टाकून सरकारला १२३५ रु. दराने विकणार. जर खुल्या बाजारात दर जास्तच वाढले तर हा नाफेडचा कांदा बाजारात विकून त्या जागेवर निकृष्ट दर्जाचा कांदा नफेडला देण्यात येऊ शकतो. या पूर्वी असे झाल्याचे सिद्ध झाले आहे. अशा खरेदीतून ना शेतकऱ्यांचा फायदा, ना ग्राहकाचा फायदा ना सरकारचा फायदा. सरकारने कांदा खरेदीचा निर्णय रद्द करावा अशा मागणीचे निवेदन, स्वतंत्र भारत पक्षा तर्फे मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आले आहे. कांद्याला दर नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी कांदा साठवून ठेवला आहे. तीव्र तापमानामुळे कांदा खराब होण्याचे प्रमाण जास्त राहण्याची शक्यता आहे. साठवणुकीचा खर्च ही वाढणार आहे. पुढील काही महिन्यात कांद्याला मिळणाऱ्या वाढीव दराचा फायदा शेतकऱ्यांना घ्यायचा असेल तर आता सरकारला कांदा विकू नये. सरकारी कांदा खरेदीवर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन करावे असे आवाहन अनिल घनवट यांनी केले आहे.

# व्यावसायिकावर पिस्तूल रोखत कुटुंबालाही मारहाण

## कल्याण रोड वरील घटना, परस्परविरोधी फिर्यादीवरून दोन्ही गटांवर गुन्हे दाखल

नगर – शहर परिसरातील कल्याण रस्ता भागात दोन तरुणांनी एका कापड व्यावसायिकाशी वाद घालत थेट पिस्तूल रोखून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. यावेळी कुटुंबियांनाही मारहाण करण्यात आली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी फिर्यादीवरून दोन्ही गटाविरोधात २ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत सनी राजेंद्र जाधव (वय २८, रा. जाधव पेट्रोलपंपामागे, कल्याण रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, १७ मे रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास सनी हे त्यांच्या मित्रासोबत घरासमोरील औषध दुकानात आले होते. त्यावेळी बोल्हेगाव येथील जुने परिचित रवी साळुंके आणि निखील चव्हाण हे दोघे तिथे आले. त्यांनी सनी यांच्याशी जुन्या कारणावरून हुज्जत घालत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढत गेल्याने निखील याने सनी यांचे हात पाठीमागून घट्ट धरून ठेवले. याच वेळी रवी साळुंके याने कमरेला लावलेले पिस्तूल काढून ते लोड केले व जीवे मारण्याची धमकी दिली.

सनी यांनी प्रसंगावधान राखून आरडाओरड केली. आवाज ऐकून सनी यांच्या कुटुंबातील सदस्य आणि नातेवाईक मदतीसाठी धावून आले. सर्वांनी मिळून मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, संशयित आरोपींनी सनी यांच्या वडिलांना आणि कुटुंबातील इतर सदस्यांना लाथाबुक्क्यांनी व हाताने बेदम मारहाण केली. यावेळी सनी यांच्या वडिलांनी धाडस दाखवून आरोपीच्या हातातील पिस्तूल हिसकावून घेतले. नागरिकांची गर्दी जमताच दोन्ही आरोपी तिथून पसार झाले. या प्रकरणी सनी जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी रवी साळुंके आणि निखील चव्हाण यांच्याविरुद्ध मारहाण आणि शस्त्र कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे. तर रवी ज्ञानेश्वर साळुंके (वय ३०, रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, फिर्यादी हे आपल्या मित्रासह कल्याण रोड परिसरात गेले होते. तेथे पूर्ववैमनस्यातून आरोपी सनी जाधव, त्याचे वडील राजेंद्र जाधव, समीर जहागीरदार, प्रमोद दाणे आणि अक्षय जाधव (सर्व राहणार जाधवनगर, कल्याण रस्ता, अहिल्यानगर) यांनी फिर्यादी रवी साळुंके यांना अचानक गाठून अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने सर्व आरोपींनी एकत्र येत फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. याच दरम्यान आरोपी राजेंद्र जाधव याने हातातील लाकडी दांडक्याने रवी साळुंके यांच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. या गंभीर हल्ल्यात फिर्यादीच्या डोक्याला मोठी दुखापत झाली.

आपल्या मित्राला वाचवण्यासाठी निखिल चव्हाण हा मध्यस्थी करण्यासाठी धावला असता, सर्व आरोपींनी त्यालाही लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून त्याचेही डोके फोडले. या घटनेनंतर परिसरात मोठा गोंधळ निर्माण झाला होता. जखमी अवस्थेत दोघांना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार घेतल्यानंतर फिर्यादी रवी साळुंके यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी सनी जाधव, राजेंद्र जाधव, समीर जहागीरदार, प्रमोद दाणे आणि अक्षय जाधव यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे.

